


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २५१ ■ शनिवार, दि. २१ मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

## देशभरात आज ईद-उल-फित्र उत्साहात

प्रतिनिधी २१ मार्च

**मुंबई:** देशभरात आज ईद साजरी होत आहे. ईदची नमाज अदा करण्यासाठी लोक मशिदींमध्ये गर्दी करत आहेत. ईद-उल-फित्रच्या निमित्ताने, राजस्थानमधील अजमेर येथील ख्वाजा गरीब नवाज दर्गाह शरीफचा 'जन्नती दरवाजा' पहाटे ५ वाजता उघडण्यात आला.

काश्मीरमध्ये शनिवारी ईद-उल-फित्र पारंपरिक उत्साहात आणि जल्लोषात साजरी करण्यात आली. दाल सरोवराच्या काठावरील हजरतबल दर्ग्यात भाविकांची सर्वात मोठी गर्दी जमली होती.हजरतबल येथे ५०,००० भाविकांनी नमाज अदा केली. मात्र, प्रशासनाने श्रीनगरच्या जुन्या शहरातील ऐतिहासिक जामा मशिदीत ईदच्या नमाजाला परवानगी दिली नाही. जामा मशिदीत नमाज न होण्याचे हे सलग सातवे वर्ष आहे. राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या. ईद-उल-फित्र मुबारक. हा दिवस बंधुभाव आणि करुणेची भावना



दृढ करो. सर्वजण सुखी आणि निरोगी राहोत असा तो शुभेच्छा संदेश होता. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि टीएमसी खासदार अभिषेक बॅनर्जी यांनी कलकत्ता खिलाफत समितीच्या ईद-उल-फित्र सोहळ्याला हजेरी लावली.ईद-उल-फित्रच्या निमित्ताने पार्लमेंट स्ट्रीट मशिदीत नमाज अदा केल्यानंतर, डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह आझाद पार्टीचे (डीपीएपी) अध्यक्ष गुलाम नबी आझाद म्हणाले, 'ईदच्या निमित्ताने आम्ही अल्लाहकडे प्रार्थना करतो की, युद्ध आणि रक्तपात, विशेषतः पश्चिम आशियामध्ये, जिथे सुमारे १ कोटी भारतीय काम करतात आणि देशाला फायदा पोहोचवतात, ते थांबावे आणि तिथे शांतता नांदावी.'

## चाकणकरांचा राजीनामा स्वीकारत मुख्यमंत्र्यांकडे पाठवणार

प्रतिनिधी २१ मार्च

**मुंबई:** महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी अखेर आपल्या पदाचा राजीनामा दिला असून, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी तो स्वीकारल्याची माहिती दिली आहे. सुरू असलेल्या चौकशीच्या पार्श्वभूमीवर निष्पक्ष आणि पारदर्शक तपास व्हावा, या उद्देशाने चाकणकरांनी पदत्यागाचा निर्णय घेतल्याचे पवार यांनी स्पष्ट केले. त्यांनी हा राजीनामा पुढील कार्यवाहीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठवला असल्याचेही सांगितले.

नाशिकमधील भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात प्रकरणाशी नाव जोडले गेल्यामुळे चाकणकर यांच्यावर मोठा राजकीय दबाव निर्माण झाला होता. शुक्रवारी सायंकाळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांना वर्षा बंगल्यावर बोलावून घेतले आणि तत्काळ राजीनामा देण्याचे निर्देश दिले. त्यानंतर रात्री सुमारे नऊच्या सुमारास चाकणकर यांनी देवगिरी बंगल्यावर जाऊन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेतली. तेथेही त्यांना पदाचा राजीनामा देण्यास सांगण्यात आल्याने त्यांच्यापुढे पर्याय उरला नाही.या बैठकीदरम्यान चाकणकर यांनी खरात प्रकरणाशी आपला कोणताही संबंध नसल्याचे सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी त्यांचा युक्तिवाद फेटाळून लावत प्रकरणाच्या गंभीरतेची जाणीव करून दिली. चाकणकर यांनी आपली भूमिका स्पष्ट करणारे पत्रही फडणवीस यांना दिले, तरीही त्यांना राजीनामा द्यावाच लागेल, असा ठाम संदेश देण्यात आला. परिणामी, त्यांनी रात्री उशिरा आपला राजीनामा सादर केला.

राज्यमंत्री दर्जा असलेल्या या पदाचा राजीनामा चाकणकर यांनी मुख्यमंत्र्यांच्या नावे लिहून सुनेत्रा पवार यांच्याकडे सुपूर्द केला आहे. पुढील प्रक्रियेनुसार हा राजीनामा मुख्यमंत्री राज्यपालांकडे मंजुरीसाठी पाठवतील. या संपूर्ण प्रकरणात विरोधकांकडून होत असलेली टीका आणि स्वतःच्या पक्षाकडून मिळत नसलेली पाठराखण यामुळे चाकणकर अडचणीत आल्याचे स्पष्ट झाले.




### दोन गॅस टँकर्स हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून मायदेशी येणार!

**नवी दिल्ली :** गेल्या २४ तासांत क्रूड ऑईलची (कच्चे तेल) वाहतूक ठप्प झालेली असतानाही, भारतीय ध्वज असलेली दोन एलपीजी (द्रवरूप पेट्रोलियम गॅस) टँकर्स येत्या काही दिवसांत 'हॉर्मुझची सामुद्रधुनी' पार करण्याच्या तयारीत आहेत, असे वृत्त रॉयटर्सने दिले आहे.

शिपिंग डेटा आणि व्यापारी सूत्रांनुसार, प्रादेशिक तणावामुळे शेकडो जहाजे नांगरलेली असताना ही दोन जहाजे थोड्या विश्रांतीनंतर आपला प्रवास पुन्हा सुरू करणार आहेत. जागतिक ऊर्जा प्रवाहासाठी अत्यंत महत्त्वाची असलेली हॉर्मुझची सामुद्रधुनी सध्या विस्कळीत झाली आहे; कारण इराणने आखातातून बाहेर पडणाऱ्या जहाजांना लक्ष्य करण्याचा इशारा दिला आहे. जगातील एकूण तेल आणि नैसर्गिक वायू पुरवठ्यापैकी सुमारे २० टक्के पुरवठा याच अरुंद मार्गावरून होतो. शुक्रवारच्या बाजार अंदाजानुसार गेल्या २४ तासांत एकाही कच्च्या तेलाच्या टँकरने ही सामुद्रधुनी ओलांडलेली नाही.










CLASSIFIED

**१००% नौकरी**

नागपुर, अमरावती मध्ये ऑफिस
व एमआयडीसी फॅक्टरीमध्ये
१० वी १२ वी, आयटीआय
( ऑल ट्रेड ) ते पदवीधर
पास/नापास मुला/मुलींची भरती.
पगार १५००० ते २२००० पर्यंत

**शुभम सर**

मो. 7350860805
7350713647



















CMYK CMYK

सिटी न्यूज अमरावती

शनिवार, दि. २१ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## मॅग्नेट' प्रकल्पांतर्गत ३२ शेतकऱ्यांचा राज्यस्तरीय अभ्यास दौरा

**अमरावती:** महाराष्ट्र अँग्री बिझनेस नेटवर्क प्रकल्पांतर्गत शेतकरी अभ्यास दौरा व प्रक्षेत्र भेटी दि. १६ ते १८ मार्च कालावधीत पार पडल्या. प्रकल्पाच्या 'बाजार विकास व प्रोत्साहन' घटकांतर्गत दौऱ्यात ३२ शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. या दौऱ्यात शेतकऱ्यांना शेतमाल प्रक्रिया, ब्रँडिंग, पॅकेजिंग आणि जागतिक बाजारपेठेतील संधींबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. शेतकऱ्यांनी चिखली येथील 'आभाळमाया शेतकरी उत्पादक कंपनी'ला भेट दिली. येथे भाजीपाला व फळे प्रक्रिया उद्योग, निर्यातीच्या संधी आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाबद्दल प्रत्यक्ष माहिती घेतली. त्यानंतर बदनापूर, जालना येथील मोसंबी संशोधन केंद्र आणि कृषी विज्ञान केंद्राला भेट देऊन फळबाग व्यवस्थापना विषयी माहिती घेतली. सिन्नर येथील कृषक मित्र अॅग्रो सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड येथे भेट देऊन परदेशातील निर्यात संधींची माहिती घेतली.

# तपोवन रोडवरील भूसंपादन कार्यालयात आग

### ♦ अग्निशमन दलाच्या तत्परतेने २० मिनिटांत नियंत्रण

प्रतिनिधी २१ मार्च



**अमरावती :** तपोवन रोड येथील उपसंचालक कार्यालय, भूसंपादन विभागात शुक्रवार दि. २० मार्च २०२६ रोजी दुपारी ०१.५५ वाजता आग लागल्याची घटना घडली. याबाबतची माहिती विवेक प्रमोद मांडगडे यांनी अग्निशमन मुख्यालय नियंत्रण कक्षाला फोनद्वारे दिली.

माहिती मिळताच पाळी प्रमुख सुनील काकडे व केंद्रप्रमुख प्रेमानंद सोनकांबळे यांच्या आदेशानुसार फायर लॉरी क्रमांक श्प२७ँ ७२०२ तात्काळ घटनास्थळी रवाना करण्यात आली. वाहन चालक सतीश वेताळकर यांच्यासह फायरमन निखिल बाठे, अमोल साळुंके आणि प्रफुल्ल भुसारी (होमगार्ड) यांनी घटनास्थळी पोहोचताच होजरील होलच्या सहाय्याने आगीवर नियंत्रण मिळवण्याचे काम सुरू केले.

अग्निशमन दलाच्या तत्पर आणि जलद कारवाईमुळे सुमारे २० मिनिटांत आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवण्यात यश आले. या आगीत भूसंपादन विभागातील जुने पाईप, जुने टायर व इतर स्क्रॅप मटेरियल जळून सुमारे ५ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे.

सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा जखमी झाल्याची नोंद नाही. सुरुवातीला विभागातील कर्मचाऱ्यांनी फायर एक्स्टिंग्विशनच्या मदतीने आग विझवण्याचा प्रयत्न केला, मात्र तो अपयशी ठरला.

या संपूर्ण घटनेत अग्निशमन दलाच्या तातडीच्या प्रतिसादामुळे मोठा अनर्थ टळल्याचे स्पष्ट झाले आहे.

## दुय्यम निबंधक कार्यालये सुट्टीच्या दिवशी सुरू राहणार

**अमरावती:** आर्थिक वर्षाच्या शेवटी मालमत्ता खरेदी दस्त नोंदणीचे प्रमाण वाढण्याची शक्यता असल्याने सुट्टीच्या दिवशी दुय्यम निबंधक कार्यालये सुरू ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार दि. २६ मार्चपासून सलग ही कार्यालये सुरू राहतील. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांत नियंत्रक यांच्या निर्देशानुसार, इष्टांक पूर्तीच्या दृष्टीने दि. २६ मार्च, दि. २८ मार्च, दि. २९ मार्च आणि दि. ३१ मार्च या चार सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी दुय्यम निबंधक कार्यालये चालू राहतील. तसेच ज्या कार्यालयांची साप्ताहिक सुट्टी ही शनिवार आणि रविवार सोडून अन्य दिवशी आहे. ती कार्यालये त्यांच्या दोन साप्ताहिक सुट्ट्यांपैकी एक दिवस चालू ठेवावीत.

# महावितरणचा वीजबिलासाठी शेतकऱ्यांकडे मोर्चा

### ♦ ७.५ एचपीपेक्षा जास्त क्षमतेच्या कृषीपंपधारकांना वीज बिल भरणे बंधनकारक

प्रतिनिधी २१ मार्च

**अमरावती:** अमरावती परिमंडळाअंतर्गत अमरावती व यवतमाळ जिल्ह्यातील ७.५ एचपी किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेच्या कृषीपंपधारक शेतकऱ्यांकडे तब्बल २०१ कोटी ६४ लाख रुपयांची वीजबिल थकबाकी आहे. थकबाकी वसुलीसाठी महावितरणकडून मार्च महिन्यात विशेष मोहिम राबविण्यात येत असून कर्मचारी घरोघरी जाऊन वीजबिल वसुली करत आहेत. त्यामुळे संबंधित थकबाकीदार शेतकऱ्यांनी थकीत वीजबिल तातडीने भरून सहकार्य करावे, असे आवाहन मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले आहे.

महावितरणने स्पष्ट केले आहे की, 'बळीराजा मोफत वीज योजना' ही सर्व कृषीपंपधारकांसाठी लागू नसून केवळ ७.५ एचपीपेक्षा कमी क्षमतेच्या कृषीपंपांसाठीच लागू आहे. या योजनेअंतर्गत शासनाने २०२५ ते २०३० या कालावधीत अशा पंपांचे चालू वीजबिल शून्य केले आहे. मात्र ७.५ एचपी किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेच्या कृषीपंपधारकांना वीजबिल भरणे बंधनकारक असल्याचे महावितरणने पुन्हा अधोरेखित केले आहे.


शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी राज्यात 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना' राबविली जात आहे. या योजनेअंतर्गत विकेंद्रीत स्वरूपातील सौर प्रकल्प उभारणी, फिडर विलगीकरण, नवीन वीजवाहिन्या, रोहित्रे आणि उपकेंद्र उभारणीची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. परिमंडळातील सुमारे २ लाख ८० हजार शेतकऱ्यांपैकी जवळपास ७० टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठ्याचा लाभ मिळत असल्याची माहिती महावितरणकडून देण्यात आली.

परिमंडळातील ७.५ एचपीपेक्षा जास्त क्षमतेच्या एकूण ६ हजार ७६ कृषीपंपधारक शेतकऱ्यांकडे २०१ कोटी ६४ लाख रुपयांची थकबाकी आहे. यापैकी अमरावती जिल्ह्यातील ४ हजार ९८ शेतकऱ्यांकडे १०६ कोटी २ लाख रुपयांची थकबाकी असून, यवतमाळ जिल्ह्यातील १ हजार ९७८ शेतकऱ्यांकडे ९५ कोटी ६२ लाख रुपयांची वीजबिल थकीत आहे. त्यामुळे महावितरणने थकबाकीदार शेतकऱ्यांना वेळेत वीजबिल भरून सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

# भातकुलीजवळ गजानन जिनिंगला भीषण आग

### ♦ हजारो क्विंटल कापूस जळून खाक, सहा कोटींची नुकसान

प्रतिनिधी २१ मार्च



**अमरावती :** दर्यापूर रोडवरील भातकुली जवळ असलेल्या संचालक असलेल्या बंटी उर्फ कुलदीप तराळ यांच्या गजानन जिनिंग प्रेसिंगला शुक्रवारी दुपारी सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत मोठ्या प्रमाणात कापूस जळून खाक झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. यामुळे सुमारे सहा कोटी रुपयांचा कापूस जळून खाक झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आगीचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, अंदाजे ५ ते ६ हजार क्विंटल कापूस आगीत जळाल्याची माहिती समोर येत आहे. या घटनेमुळे सुमारे पाच कोटी रुपयांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याची सूत्रांची माहिती आहे.

घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाच्या ३ ते ४ गाड्या तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या असून, आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. आग आटोक्यात आणण्यासाठी युद्धपातळीवर काम सुरू होते.

दरम्यान, महसूल विभागाची टीमही घटनास्थळी पोहोचली असून, पोलीसही तातडीने दाखल झाले आहेत. परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज झाल्या आहेत. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, नागरिकांनी मोठी गर्दी केली आहे.

# कर धोरणामुळे बार उद्योग संकटात; परवाने सामूहिक समर्पणाचा इशारा

प्रतिनिधी २१ मार्च



**अमरावती :** Amravatied District Permit Roomed Asociation तर्फे राज्य सरकारच्या कर धोरणाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली असून, हॉटेल व बार (FL-III) उद्योगाला सध्या गंभीर आर्थिक संकटाचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनातून स्पष्ट करण्यात आले आहे. अध्यक्ष नितीन मोहोड व कार्याध्यक्ष संजय मानकर यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन सादर करण्यात आले.

संघटनेने मुख्यमंत्री (वित्त मंत्री), राज्य उत्पादन शुल्क मंत्री, मुख्य सचिव तसेच संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे विविध मागण्या मांडल्या आहेत. यात प्रमुख मागणी म्हणजे मद्यावर लावण्यात आलेला VAT तात्काळ रद्द करावा, तसेच FL-III परवाना शुल्काची जनसंख्या आधारित पद्धत रद्द करून बसण्याची क्षमता किंवा व्यवसायाच्या उलाढालीवर आधारित युक्तिसंगत प्रणाली लागू करावी.

सद्यस्थितीत कर वाढ, परवाना शुल्कात वाढ आणि उत्पादन शुल्कातील वाढ यामुळे अधिकृत बारमध्ये ग्राहकांची संख्या घटली असून, अवैध ठिकाणी मद्यसेवन वाढल्याचा आरोप करण्यात आला आहे. "Car-o-Bar", ढाबे, रिसॉर्ट्स आणि खासगी ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अवैध मद्यसेवन सुरू असल्यामुळे सरकारलाही महसुलात तोटा होत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, जुलै २०२५ मधील आंदोलनात अमरावती जिल्ह्यात सुमारे ५०० बार बंद ठेवण्यात आले होते. तसेच राज्यभरात २०,००० पेक्षा अधिक बार व परमिट रूमनी आंदोलनात सहभाग घेतला होता.

संघटनेने अवैध मद्यसेवेवर कठोर कारवाई करण्याची मागणी करताना अमरावतीतील 'फिरंगा', 'सुदामा', 'राजवाडा', 'छावणी', 'कास्तकार', 'पूरब' या ठिकाणी कारवाईची मागणी केली आहे. तसेच निरीक्षक-राजमुळे व्यवसायिकांना त्रास होत असल्याचा आरोप करत डिजिटल अनुपालन प्रणाली लागू करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

एकदिवसीय परवान्यांवर नियंत्रण, विक्री वेळेचे समान पालन आणि इतर राज्यांतून होणारी अवैध मद्य तस्करी रोखण्याची मागणी देखील करण्यात आली आहे.

सरकारने २१ मार्च २०२६ पर्यंत निर्णय न घेतल्यास १ एप्रिल २०२६ पासून इथ्-छ्घ्घ् परवाने सामूहिकपणे समर्पित करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

## दिव्यांग लाभार्थ्यांनी २५ मार्चपर्यंत दिव्यांग कार्ड जमा करावे

**अमरावती:** संजय गांधी निराधार योजनेंतर्गत दिव्यांग लाभार्थ्यांच्या अनुदानात वाढ करण्यात आली आहे. आता लाभार्थ्यांना दरमहा अडीच हजार रुपये अनुदान थेट लाभ हस्तांतरणाद्वारे देण्यात येत आहे. या प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी त्यांचे ऑनलाईन यूडीआयडी कार्ड म्हणजेच दिव्यांग प्रमाणपत्र अपडेट करणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे लाभार्थ्यांनी २५ मार्चपर्यंत दिव्यांग प्रमाणपत्र जमा करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. ज्या लाभार्थ्यांकडे अद्याप ऑनलाईन यूडीआयडी कार्ड नाही, त्यांनी जिल्हा सामान्य रुग्णालय येथे जाऊन ते प्राप्त करून घ्यावे.

# आगीत घर जळालेल्या लोकांना कॉँग्रेसतर्फे कपडे वाटप

प्रतिनिधी २१ मार्च



**चिखलदरा :** चिखलदरा तालुका अंतर्गत बुटीदा या गावात काल अचानक लागलेल्या भीषण आगीत तीन घरे जळून खाक झाल्याची घटना समोर आली आहे.

माहिती मिळताच सदर घटनेची पाहणी केली असता सदैवणे या घटनेत जिवंत हानी टळली तरी मोठ्या प्रमाणावर मालमत्तेचे नुकसान झालेले आहे.

या आगीत (राम कृष्ण चित्राम भूसूम),( मनुलाल मंटू कासदेकर ), (रमेश भुता बेठेकर) यांची घरे जळून खाक झाली. घरातील कपडे धान्य भांडीकुंडी व जीवनाशक साहित्य अत्यावश्यक कागद पत्रे नष्ट झाले तहसीलदार यांच्याशी संपर्क केला असता त्यांना आर्थिक मदत करण्याची कोनतेही तरतुद नाही असे सांगीतले शासनाने त्यांना मदत करावी ही आमची प्रामाणिक मागनी आहे.

यासाठी माज़ी मंत्री यशोमती ठाकुर व खासदार बळवंत वानखडे यांच्या कडून आर्थिक मदत करण्यात आली व कीराना साहित्य देण्यात आले.

यावेळी राहुल येवले जिल्हाध्यक्ष युवक कॉँग्रेस अमरावती सोनाजी सावलकर सरपंच संदीप मुंडे युवक कॉँग्रेस ता अध्यक्ष चिखलदरा पतिराम भैया पंकज अखंडे व गांवकरी उपस्थित होते.

## 'स्वाधार' योजनेतील त्रृटी पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ

**अमरावती:** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी अर्ज केलेल्या, परंतु कागदपत्रांतील त्रुटींमुळे कार्यालयस्तरावर प्रलंबित असलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी दि. ३० मार्चपर्यंत त्रृटी पूर्ण कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. राज्य शासनाने शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला नसलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील अकरावी, बारावी, तसेच बारावीनंतरच्या व्यावसायिक आणि अव्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना भोजन, निवास आणि इतर शैक्षणिक सुविधांसाठी थेट आर्थिक मदत देण्यासाठी 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना' सुरू केली आहे. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत, त्यांच्यापैकी काही अर्ज कागदपत्रांतील कमतरतेमुळे कार्यालयात प्रलंबित आहेत.

# केंद्र प्रमुख मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण उमेदवारांना माहिती भरण्यास ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ

प्रतिनिधी २१ मार्च

**अमरावती :** पुणे येथील महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०२५ चा निकाल जाहीर केला असून तो परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर (www.mscepune.in) प्रसिद्ध करण्यात आला आहे. या परीक्षेत प्रविष्ट झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा महाटीइटी अथवा सीटीइटी उत्तीर्ण झाल्याची माहिती भरण्यासाठी २२ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार जिल्हा परिषदांमध्ये कार्यरत प्राथमिक शिक्षकांना केंद्र प्रमुख पदावर विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षेद्वारे नियुक्ती देण्यासाठी समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०२५ घेण्यात आली होती. ही ऑनलाइन परीक्षा ३ ते ४ फेब्रुवारी २०२६ दरम्यान तीन सत्रांत पार पडली. परीक्षेसाठी एकूण ४६०६८ परीक्षार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज भरले होते, त्यापैकी ३८५५९ परीक्षार्थी प्रत्यक्ष परीक्षेला उपस्थित होते.

परिषदेकडून हा निकाल १३ मार्च २०२६ रोजी परिषदेचे अधिकृत संकेतस्थळ ै.स्मज्ल्हा.ग्ह वर जाहीर करण्यात आला. परीक्षेत प्रविष्ट झालेल्या उमेदवारांनी महाटीइटी अथवा सीटीइटी ही सर्वांत पहिली परीक्षा उत्तीर्ण झाल्याची माहिती पूर्वी १६ मार्च ते २१ मार्च २०२६ या कालावधीत https://mscepune.in/dtedola/KP2026Info.asर्े या लिंकवर भरायची होती.

# बुधवारा येथील सार्वजनिक श्री. हनुमान मंदिरात हनुमान जन्मोत्सवानिमित्त अखंड रामायण पठन व भव्य धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल

प्रतिनिधी २१ मार्च



**अमरावती:** शहरातील बुधवारा परिसरातील आझाद हिंद मंडळाच्या वतीने सार्वजनिक श्री. हनुमान मंदिर येथे गुढीपाडव्यापासून श्री. हनुमान जन्मोत्सवापर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले असून परिसरात सध्या भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

हनुमान जन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिरात अखंड रामायण पठनास प्रारंभ करण्यात आला असून कुंदन महाराज यांच्या वाणीतील रामायण वाचन २४ तास आहे. भाविक मोठ्या श्रद्धेने उपस्थित राहून रामनामाचा लाभ घेत आहेत.

संस्थेच्या वतीने दि. २६ मार्च २०२६ रोजी श्री. राम जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा करण्यात येणार असून यावेळी परिहार महिला भजनी मंडळ यांचे भक्तिमय भजन सादर होणार आहे.

हनुमान जन्मोत्सवानिमित्त पुढील विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. दि. ३१ मार्च व १ एप्रिल, सायं. ७.३० वा. — ह.भ.प. श्री रविंद्र महाराज बाळापुरे यांचे वारकरी कीर्तन

दि. १ एप्रिल, रात्री ११.०० वा. श्री सतीश श्रीवास व संच यांचे संगीत तुलसी रामायण (सुंदरकांड) सादरीकरण

दि. २ एप्रिल, पहाटे ५.०० वा. ह.भ.प. डॉ. श्रीकृष्णराव जिरापुरे यांचे हनुमान जन्मोत्सव कीर्तन

दि. २ एप्रिल, सायं. ७.३० वा. सुप्रसिद्ध गायक श्री आशुतोष देशपांडे व श्री मधुसदन वटक यांचा भक्ती संगीत कार्यक्रम

दि. ३ एप्रिल, सायं. ६.०० वा. गोपाळकाल्याचे कीर्तन

त्यानंतर सायं. ७.३० वा. महाप्रसाद वितरण

या धार्मिक सोहळ्यांना उपस्थित राहून आध्यात्मिक आनंदाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सार्वजनिक श्री. हनुमान मंदिर, बुधवारा अमरावतीच्या विश्वस्त मंडळातर्फे करण्यात आले आहे.

# श्री. स्वामी समर्थ महाराजांच्या प्रगट दिन सोहळ्यात भाविक भक्तांची मांदियाळी

### ♦ श्री. स्वामी समर्थ महाराजांचे प्रगटदिनानिमित्त 'श्रींचे' गाभाऱ्यात मनमोहक फुलांची तसेच रसाळ व सुमधुर फळांची आरास ठरले मुख्य आकर्षण

प्रतिनिधी २१ मार्च



**अमरावती :** सदभक्तांच्या भक्तीला उमाळा देणारा आणि आध्यात्मिक संरक्षण देऊन शब्दातीत भक्तिमय आनंद देणारा क्षण म्हणजेच अनंतकोटी ब्रह्मांडनायक परमगुरु परब्रम्ह भगवान श्री. स्वामी समर्थ महाराज यांचा प्रगटदिन सोहळा होय.आपल्याला येणारा अनुभव, निर्माण होणाऱ्या भावना यांचा अध्यात्म, दैनंदिन उपासना, ईश्वरी आराधना व सदाचारी वृत्ती आदी बाबींशी खूप जवळचा संबंध आहे.स्पर्धेचे युग, वाढती गतिमानता, विकसित तंत्रज्ञान या त्रिसूत्रीचा अवलंब होत असला तरी आज आपण कठीण काळातून जात आहोत, असा आभास होतोय. सर्व भौतिक सुख हात जोडून आपल्यासमोर उभे आहेत. तरीही सध्याच जीवन अनेक समस्यांनी ग्रासलेलं आहे. नित्यनवीन संकट त्यात भर घालत आहेत आणि आपल जीवन तणावपूर्ण बनलं आहे. विज्ञानामुळे मानवाची पावलं चंद्रावर पोहोचली असली तरी त्याच्या मनाला अजूनही शांती लाभलेली नाही. शांती, समाधान, उत्कर्ष, उन्नतीसाठी कशाची गरज असते तर ती मानसिक समाधानाची. यासाठी भाविक भक्तांद्वारे भारतीय संस्कृती अनुरूप अनेक प्रकारच्या उपासना व भक्तीभावाने दैनंदिन पद्धतीने ईश्वरी आराधना व उपासना प्राचीन काळापासून केल्या जात आहे. शुक्रवार दिनांक २० मार्च २०२६ रोजी अमरावती शहरात अनंतकोटी ब्रह्मांडनायक परमगुरु परब्रम्ह भगवान श्री. स्वामी समर्थ महाराज, अक्कलकोट यांच्या प्रगटदिन सोहोळ्याचे आयोजन करण्यात आले.

यावेळी मुदलियार नगर, जनार्धन पेठ, बुधवारा आदिसह अमरावती शहरात विविध ठिकाणी धार्मिक - अध्यात्मिक - भजनसंध्या - महाप्रसाद आदिसह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्री स्वामी समर्थ - श्री स्वामी समर्थ असा नामघोष करीत भाविकभक्त व सर्व स्वामी सेवेकरी यावेळी भक्तीसागरात तल्लीन झाल्याचे दृश्य यादरम्यान दिसून आले. याप्रसंगी मुदलियार नगर येथील श्री स्वामी समर्थ मंदिर गाभाऱ्यात आकर्षक फुलांची मनमोहक आरास व सजावट करण्यात आली होती. स्वामी सेवेकरी बांधव व भगिनींच्या वतीने स्वामी समर्थ प्रतिमेसमोर महाप्रसादाची सामूहिक थाली ठेवण्यात आली होती. यादरम्यान निशंक होई रे मना, निर्भय होई रे मना............ चे मंजुळ स्वरात भाविकभक्तांनी श्री स्वामी समर्थ महाराज यांची सामूहिक प्रार्थना करीत यावेळी सर्वांचे लक्ष वेधल्याचे चित्र देवालयात दिसून आले. यासोबतच जनार्धन पेठ येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात सुमधुर द्राक्ष तसेच विविध फळांची आरास करण्यात आली होती. तसेच शिस्तबद्ध रित्या महाप्रसादाच्या पंक्तीत सर्व भाविकभक्त अमृततुल्य महाप्रसादाचा लाभ घेत असताना स्वामी सेवेकरी व स्वयंमसेवक समर्पित भावनेचा परिचय करून देत अखंडितपणे सेवा देत असल्याचे दृश्य याप्रसंगी दिसून आले. बुधवारा येथील वटवृक्ष स्वामी समर्थ केंद्र येथे सुद्धा श्री स्वामी समर्थ महाराजांचे दर्शन - आशीर्वाद - अखंडित कृपाशीर्वाद घेण्यासाठी यावेळी भक्तजनांची एकच गर्दी दिसून आली.सेवामार्गाची शुद्धता व निर्मलता, अनन्य भावाने चिंतन केल्यास सर्व प्रकारच्या योगक्षेमाची हमी, पूर्व संचिताचा मागोवा न घेता सर्वार्थीने कल्याण अशा दिव्य अनुभूतीचा अनुभव व प्रचिती घेत श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक संस्कार व सेवा केंद्रावर सर्व भाविकभक्त व स्वामी सेवेकरी स्वामीरायांच्या प्रतिमेचे चरणी नतमस्तक होऊन विश्वकल्याणाची प्रार्थना करीत असताना सर्वत्र आपण जणू अक्कलकोट नगरीत असल्याचा भास होत होता. // भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे // हा श्री स्वामी समर्थ महाराजांचा कृपाशीर्वाद घेऊन प्रत्येक भाविकभक्त आपल्या उपास्य देवतेची आराधना करीत होता.

सिटी न्यूज अकोला

शनिवार, दि. २१ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## २९ मार्चपासून खेडकर नगरातील महारुद्र हनुमान मंदिरात विविध कार्यक्रम

**अकोला:** स्थानिक खेडकर नगरातील महारुद्र हनुमान मंदिरात २९ मार्च पासून हनुमान जयंती निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

२९ रोजी रात्री ७ ते १० पर्यंत ह. भ. प. सुशील महाराज वनवे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सेवाश्रम शेगाव यांचे कीर्तन, ३० रोजी रात्री ७ वाजता संत सुविचार महिला भजनी मंडळ उमरी



अकोला यांचे भजन, ३१ रोजी रात्री ७ वाजता सुंदर कांड, १ एप्रिल रोजी रात्री ७ ते १० संदीपपाल महाराज यांचे कीर्तन, २ एप्रिल रोजी सकाळी ६ वाजता अभिषेक व महापूजा तसेच रात्री ७ वाजता महाप्रसाद होईल. भाविक भक्तांनी कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन महारुद्र हनुमान मंदिराच्या संचालक मंडळाने केले आहे.

## प्रमोद मुरुमकार यांची खास मुलाखत आज 'किसानवाणी'मध्ये



**अकोला:** महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष तथा प्रगतिशील शेतकरी प्रमोद प्रल्हादराव मुरुमकार यांच्या युरोप विदेश शेतकरी अभ्यास दौऱ्यासंदर्भातील विशेष मुलाखत शनिवार दि. २१ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ७.३० वाजता अकोला आकाशवाणीच्या 'किसानवाणी' या लोकप्रिय कार्यक्रमातून प्रसारित होणार आहे. युरोप दौऱ्यातील आधुनिक शेती तंत्रज्ञान, उत्पादनवाढीचे नवे प्रयोग, शाश्वत शेती पद्धती तसेच शेतकऱ्यांसाठी उपयुक्त असलेल्या विविध संकल्पनांचा उहापोह या मुलाखतीत करण्यात आला आहे. मुरुमकार यांनी प्रत्यक्ष अनुभवातून मांडलेले विचार स्थानिक शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरणार असल्याचे मानले जात आहे.

## जनगणनाविषयक प्रशिक्षण सोमवारपासून

**अकोला:** जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी जनगणनाविषयक प्रदर्शन २३ ते २५ मार्च दरम्यान नियोजनभवनात होणार आहे.

मान्यवरांच्या उपस्थितीत सोमवारी (२३ मार्च) सकाळी ९.३० वा. प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी जनगणना कक्षाचे उद्घाटनही होईल. तहसीलदार, मुख्याधिकारी यांच्यासह अनेक अधिकारी प्रशिक्षणात सहभागी होतील.

## समाजकल्याण कार्यालयातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन

**अकोला:** महाड येथील ऐतिहासिक चवदार तळ्याचा सत्याग्रह शताब्दी वर्ष, तसेच भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून सामाजिक न्याय विभागातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती समाजकल्याण सहायक आयुक्त एम. जी. वाठ यांनी दिली. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून उपक्रमाचा शुभारंभ झाला. उपक्रमात सामाजिक न्याय विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय निवासी शाळा, वसतिगृहे, कार्यालये येथे दि. २० ते २२ मार्चदरम्यान महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह लघुनाट्य आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# वांगरगावात शिवाजी महाराजांचा पुतळा हटविण्यावरून तणाव, कारवाईला विरोध

प्रतिनिधी २१ मार्च

**तेल्हारा:** तालुक्यातील वांगरगावात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हटविण्यावरून शुक्रवारी रात्री तणाव निर्माण झाला होता. मोठया प्रमाणात जमाव गोळा झाला. महिलांनी संरक्षण कडे करून पुतळा हटवू नका अशी भूमिका घेतली होती. गावात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यसाठी वरिष्ठ अधिकारी, पोलिस, होमगार्ड व आरसीपीची तुकडी तैनात करण्यात आली होती पोलिस बंदोबस्तही गोठ्या प्रमाणावर तैनात करण्यात आला आहे. कोणतीही कार्यवाही झाली नाही. सध्या स्थिती नियंत्रणात आहे.

वांगरगावात शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची स्थापना केली. कुठलीही अधिकृत परवानगी नसल्याने ग्राम पंचायत प्रशासनाने याबाबत तेल्हारा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व पोलिस



स्टेशनमध्ये तक्रार दिली. त्यानुसार २० मार्च रोजी पुतळा हटवण्याची प्रक्रिया सुरू झाली. त्याठिकाणी प्रशासनाचे अधिकारी, ठाणेदार व त्यांचे सहकारी दाखल झाले. परंतु हा पुतळा काढू नका अशी मागणी करण्यात आली तर दुसरीकडे हा पुतळा काढण्याबाबत प्रशासन ठाम होते. पुतळा हटवू नका किंवा झाकून ठेवू नका असे गावकऱ्यांचे म्हणणे होते. प्रशासनाने शांततेचे आवाहन केले आहे. कोणत्याही प्रकारचा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी खबरदारी घेतली जात आहे.

परवानगी न घेता उभारलेला महाराजांचा पुतळा सटविण्याबाबत १८ फेब्रुवारी रोजी ग्रामपंचायत प्रशासनाकडून तक्रार प्राप्त झाली होती. त्यामुळे २६ फेब्रुवारी रोजी पुतळा काढण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार होती. परंतु काही कारणास्तव ही कार्यवाही त्यावेळी न करता२० मार्च रोजी ही कारवाई करण्यासाठी पोलिस बंदोबस्त लावला होता. गावकऱ्यांनी विरोध केल्याने पुतळा हटविण्याबाबत पुढील कारवाई करण्यात आली नाही. लोकांनी विनाकारण अफवा पसरवू नये असे आवाहन करण्यात आले. तसेच पुढील निर्णय नियमानुसार घेतला जाईल असे प्रशासनाने स्पष्ट केले. गावात शांतता आहे.

> छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवण्यात आला. याबाबत प्रशासकीय परवानगी व नियमांची पूर्तता झाली आहे का, याची पडताळणी करण्यासाठी पोलीस व प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत.
>
> **प्रकाश तुनकुलवार,**
> ठाणेदार, तेल्हारा

> नियमावली विचारात न घेता अज्ञात लोकांनी वांगरगाव येथे पुतळा बसविला होता. ग्रामपंचायत प्रशासनाने याबाबत तेल्हारा पोलिसात तक्रार दाखल केली होती, त्यानुसार पुढील कारवाई सुरू करण्यात आली.
>
> **अशोक बांगर,**
> गटविकास अधिकारी, तेल्हारा

## झुलेलाल जयंती निमित्त शहरात शोभायात्रा

प्रतिनिधी २१ मार्च

**अकोला:** झुलेलाल जयंती निमित्त सिंधी बांधवांनी शुक्रवारी दुपारी शहरात शोभायात्रा काढली होती. शोभायात्रा शोभायात्रेचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. शहरवासीयांनी सिंधी बांधवांना शुभेच्छा दिल्या. तसेच शोभायात्रेच्या मार्गावर स्वागत कमानी उभारण्यात आल्या होत्या.

विविध देखावे शोभायात्रेत सामील होते. देवीदेवता तसेच देशासाठी अभिमानाचा क्षण राहिलेले ऑपरेशन सिंदूर तसेच शस्त्रास्त्रांचे देखावे आकर्षण ठरले. झुलेलाल जयंती शोभायात्रेला काही वर्षांची परंपरा आहे. जयंती निमित्त



सिंधी कँप भागात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सिंधी समाज बांधवांचा त्यात मोठ्या प्रमाणात सहभाग होता. तसेच शोभायात्रेत देखील अतिशय उत्साहात समाज बांधव सहभागी झाले होते. शहराच्या प्रमुख मार्गाने फिरून सिंधी कँप मध्ये सांगता करण्यात आली. झुलेलाल महोत्सव समिती अध्यक्ष विनोद मनवानी, कार्याध्यक्ष महेश संतानी, महासचिव हरीश कटारिया, कोषाध्यक्ष मनोज बजाज, नगरसेवक हरीश आलिमचंदानी, दीप मनवानी तसेच समाज बांधवांचा आयोजनात सहभाग होता.

## रा. काँ. शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने तहसीलदारांना निवेदन

प्रतिनिधी २१ मार्च

**अकोट:** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अकोट तालुकाध्यक्ष श्रीयश चौधरी यांनी शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्या ही मागणी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली.

तालुक्यात अवकाळी पाऊस, व गारपीटीने झालेल्या नुकसानीची सरसकट भरपाई देण्यात यावी. यासाठी रा.का.शरदश्चंद्र पवार पक्षाचे वतीने तहसीलदार अकोट यांना निवेदन देण्यात आले.१९ मार्चला अवकाळी पावस व



जोरदार गारपीट झाली.त्यामुळे शेतीमाल गहु, ज्वारी, मका,

कांदा, केळी, आंबा व भाजीपाल्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.त्यांचे पंचनामे न करता शेतकऱ्यांना सरसगट नुकसान भरपाई देण्यात यावी.या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार अकोट तालुक्याचे वतीने २० मार्च रोजी जिल्हाध्यक्ष संग्राम भैय्या गावंडे, विधानसभा अध्यक्ष नानासाहेब हिंगणकर, प्रदेश प्रतीनिधी शंकरराव चौधरी यांचे मार्गदर्शनात, अकोला जि. बुथकमेटी प्र. कैलास गोंडचर यांचे प्रमुख उपस्थीती तथा तालुकाध्यक्ष श्रियश चौधरी यांचे नेतृत्वात निवेदन देण्यात आले. यावेळी जेष्ठ सदस्य रामदास मंगळे, सिंकदर मर्दाने, मनीष तळोकार, सुरेश चौधरी, अंकुश चौधरी, आकाश चव्हाण, देवेश चौधरी, नरेंद्र कोंडे, निखिल फोकमारे, पवन चौधरी, अमित चौधरी, समर्थ अवारे, सागर चौधरी हे पदाधिकारी हजर होते.

# बार्शीटाकळी येथे ईद उत्साहात साजरी

प्रतिनिधी २१ मार्च

**बार्शीटाकळी:** येथे ईद उत्साहात साजरी करण्यात आली. ईदनिमित्त ईदगाहवर नमाज झाल्यावर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या.

मुस्लिम बांधव एक महिन्याचा उपवास ठेवतात. रमजान महिना पवित्र असून या महिन्यात अन्नदान, कपडे दान करतात. या महिन्यात काही मुस्लिम बांधव उंबराकरिता मक्का मदिना, सौदी अरब येथे पण जातात.

या महिन्यांमध्ये गरीब असो किंवा श्रीमंत सगळे उपवास धरून मशीदीत मध्ये तराबीची नमाज पठणासाठी जातात. एक



महिना तराबीची नमाज पडल्यानंतर ईद साजरी करतात. रमजान महिन्यांमध्ये कधी २९ उपवास होतात तर कधी ३० उपवास होतात. या महिन्यात ३० उपवास झाले. बार्शीटाकळी येथे मशीदीत शनिवारी सकाळी साडेआठ वाजता इदची नमाज अदा करण्यात आली. मिनार मशीदीत सव्वा नऊ वाजता नमाज अदा करण्यात आली. ईदगाहवर हिंदू लोक मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देण्याकरिता उपस्थित होते. बार्शीटाकळीचे ठाणेदार धुमाळे यांनी मुस्लिम बांधवांना गुलाबाचे फुल देऊन शुभेच्छा दिल्या. ईद ची नमाज झाल्यावर मुस्लिम बांधव कब्रस्तान येथे जाऊन त्यांचे मरण पावलेले नातेवाईकांच्या कबर वर जाऊन फुले वाहिली. कब्रस्तान मध्ये हजारोंच्या उपस्थितीत आपले नातेवाईक तसेच ईष्टमित्रांचे स्मरण केले. अतिशय उत्साही वातावरणात ईद साजरी करण्यात आली.

## मोठ्या राम मंदिरात रामनवमी उत्सवानिमित्त विविध उपक्रम

प्रतिनिधी २१ मार्च

**अकोला:** संत गजानन महाराजांच्या पदस्पर्शाने पावन आणि स्व. बच्चुलाल अग्रवाल यांच्या प्रेरणेने स्थापित मोठ्या राम मंदिरात प्रल्हाद महाराज महिला भजनी मंडळ तसेच श्री जानकी वल्लभो धर्मार्थ संस्था श्रीराम हरिहर संस्था व रामनगर मित्र मंडळच्या वतीने १ लाख श्रीराम जय राम जय जय राम तसेच गण गणात बोते २१०००, मा दुर्गा नामजप २१०००, राम रक्षा मारुती स्तोत्र सह अकोलेकरांच्या कल्याणासाठी नामजप करण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सनातन धर्माची प्रगती व्हावी अशी प्रार्थना केली जात आहे. २१ मार्चला सूर्य, राहू, शनि, मंगळ, गुरु, शुक्र, बुध, ग्रहांना यांना प्रसन्न करण्यासाठी मानव कल्याणा सोबत स्वकल्याण तसेच परिसराचा विकास तसेच प्रभू श्रीरामाचा आदर्श ठेवून जीवनातही सकारात्मक ऊर्जा, धैर्य आणि आत्मविश्वास अकोलेकरांमध्ये निर्माण व्हावी या दृष्टीने हा चार तासाचा कार्यक्रम प्रभू रामचंद्राच्या साक्षीने करण्यात आला.

४१ वर्षापासून प्रभू रामचंद्राच्या प्रगट उत्सवात सेवा देणारे गिरीश जोशी यांच्या



संकल्पनेतून हा कार्यक्रम करण्यात आला. यामध्ये मातृशक्ती मोठ्या संख्येने सहभागी होती. संस्थेच्या वतीने सहभागी मातृ शक्तीचा श्रीफळ व ब्लाउज पीस प्रसाद देऊन संस्थेच्या अध्यक्ष सौ. सुमनदेवी अग्रवाल यांनी सत्कार केला. संस्थेचे उपाध्यक्ष विनायक शांडिल्य गुरुजी,

गिरीराज तिवारी, अनिल मानधने, हरीश चौधरी, राम ठाकूर, हेमंत शर्मा विजय अग्रवाल, अजय जोशी, महेश चौधरी, चंद्रशेखर खडसे आशादेवी गोइंका अजय गुल्हाने राम रतन सारडा, संजय अग्रवाल, प्रकाश भुसारी शीला तिवारी संजय जीरापुरे, बनवारीलाल बजाज किसन गोपाल पुरोहित, महेंद्र पुरोहित रमेश लड्डा आदी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी संध्या देशपांडे यांचाही सन्मान करण्यात आला.

## हिवरखेड स्वामी समर्थ केंद्रात प्रगट दिन साजरा

प्रतिनिधी २१ मार्च

**हिवरखेड:** येथील गाडगे नगर परिसरातील स्वामी समर्थ केंद्रात २० मार्चला स्वामी समर्थ यांचा प्रगट दीन उत्साहाने साजरा करण्यात आला. श्री स्वामी समर्थ सेवेकरी यांनी सकाळी भूपाळी



आरती, दुपारी आरती, संध्याकाळी आरती करून स्वामी समर्थ केंद्रात स्वामीची भाविक महिला पुरुष लहान मोठ्यानी आपली सेवा अर्पण केली. सकाळ पासून केंद्र परिसरात स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी गर्दी केली होती.

## हिवरखेडला ईद उत्साहाने साजरी

**हिवरखेड:** मुस्लिम कब्रस्थान, ईदगाह येथे रमजान ईद उत्साहात साजरी करण्यात आली. सर्व मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

ठाणेदार गजानन राठोड, जमीर भाई पठाण, पोलिस पाटील गावंडे, प्रदीपदादा पाटील, हिफाजतखा, किशोर वासेकर, शाहरुख लाला, पत्रकार अर्जुन खिरोडकार यांच्यासह स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# राम अयोध्येत जन्मले, पण महाराष्ट्रात त्यांनी नामरूप घेतले : डॉ. भूषण फडके

प्रतिनिधी २१ मार्च

**अकोला:** 'रामायण ही केवळ जुनी कथा किंवा इतिहास नाही, तर ती मनुष्याला माणूस बनवणारी एक दिशा आहे. प्रभू श्रीराम अयोध्येत सगुण रूपात जन्मले असले, तरी महाराष्ट्रातील संतांनी त्यांना 'नामरूपाने' आपल्या प्रत्येकाच्या हृदयात अजरामर केले आहे,ठ असे प्रतिपादन रामकथाकार डॉ. भूषण फडके यांनी केले.

निलेश देव मित्र मंडळाच्या वतीने बिर्ला मंदिरात आयोजित पाच दिवसीय 'संगीत श्रीरामकथा' महोत्सवाचा श्रीगणेशा बुधवारी बालकांडाच्या निरूपणाने झाला. याप्रसंगी डॉ. फडके यांनी वाल्मीकी रामायणातील




प्रसंगांची सांगड वारकरी संप्रदायातील संतांच्या शिकवणीशी घालत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. श्रीरामजन्म, त्राटिका वध, अहल्या उद्धार, सीता स्वयंवर या घटनांची गुंफण डॉ. फडकेंनी रंजक आणि अभ्यासपूर्ण निरुपणातून केली.

तुकोबांची नामभक्ती आणि ज्ञानेश्वरांचा संयम ठअयोध्येतील रामजन्माचा आनंद आणि पंढरीच्या वाळवंटातील भक्तीचा खेळ हा एकच आहे, असे सांगत डॉ. फडके यांनी जगद्गुरू तुकाराम महाराजांच्या 'राम कृष्ण हरी' मंत्राचा महिमा विशद केला. तसेच, दशरथाला मिळालेला 'पुत्रवियोगाचा शाप' कुलगुरू वसिष्ठ ऋषींनी जसा सकारात्मकतेने स्वीकारला, तसेच संत ज्ञानेश्वर माऊलींनी जगाच्या निंदेचा राग न धरता 'पसायदान' मागून विश्वाच्या कल्याणाचा मार्ग दाखवला, असेही त्यांनी नमूद केले.

संत एकनाथ महाराज आणि भावार्थ रामायण निरूपणादरम्यान डॉ. फडके यांनी संत एकनाथ महाराजांच्या कार्याचा गौरव केला. ते म्हणाले, ठनाथांनी 'भावार्थ रामायणातून' रामाचा खरा भाव जनसामान्यांपर्यंत पोहोचवला. विश्वामित्रांनी रामाला दिलेली 'बला' आणि 'अतिबला' ही विद्या म्हणजे केवळ मंत्र नसून ते रामाच्या आत्मबळाचे जागरण होते, असे नाथांनी स्पष्ट केले आहे.

अहल्या शिळा झाली होती याचा अर्थ ती भावशून्य झाली होती. संत नामदेव महाराजांच्या मते, जेव्हा मानवी मन संसाराच्या तापाने पाषाणासारखे कठोर होते, तेव्हा केवळ 'रामनामाचा' स्पर्शच त्याला पुन्हा सजीव करू शकतो.

प्रसंगानुरूप गीतांनी वातावरण भक्तिमय झाले. तुझ मागतो मी आता, राम का गुणगान करिये, खेळ मांडीयेला वाळवंटी घाई हि गीते वैशाली फडके यांनी, तर कुश लव रामायण गाती, दशरथा घे हे पायसदान, आजी सोनियाचा दिनू, हि गीते प्रा.निखील देशमुख यांनी तर देवाशिष फडके याने जेष्ठ तुझा पुत्र मला देई दशरथा, चला राघव चला, स्वयंवर झाले सीतेचे हि गीते सदर करून श्रोत्यांची वाहवा मिळविली, हर्मोनियम ची साथ देवशिष फडके, तबल्याची हार्दिक दुबे, मृदंग विघ्नेश बोकसे, टाळ सुमंत तऱ्हाळकर, यांनी केली. दिलीप देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. नगरसेवक निलेश देव, गजानन पुसेगावकर, जयंतराव सरदेशपांडे, अजय शास्त्री, संजय देशमुख, यांनी आरती केली.

## आलेगावात उत्साह आणि शांततेत साजरी झाली ईद-उल-फितर





प्रतिनिधी २१ मार्च

**आलेगाव:** ता. पातूर पवित्र रमजान महिन्याचे ३० दिवस रोजा (उपवास) पूर्ण केल्यानंतर आलेगाव येथे ईद-उल-फितरचा सण मोठ्या उत्साहात आणि शांततेत साजरा करण्यात आला. सकाळपासूनच गावात आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. लहान मुले, युवक तसेच वयोवृद्ध नागरिक पारंपरिक पोशाख परिधान करून ईदगाहकडे रवाना झाले होते.

ईदगाहवर मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव एकत्र येऊन ईदची नमाज अदा करण्यात आली. नमाजनंतर देशात अमन, शांती आणि बंधुभाव कायम राहावा यासाठी विशेष प्रार्थना करण्यात आल्या. गावात एकात्मतेचा आणि सौहार्दाचा सुंदर संदेश या निमित्ताने देण्यात आला.

जामा मशिदीचे इमाम हाफिज जुबैर यांनी ईदगाहवर नमाज अदा करून दिली, तर बदर मशिदीत हाफिज गुलाम यासीन यांनी नमाज पठण केले. दोन्ही ठिकाणी शिस्तबद्ध वातावरणात नमाज पार पडली.

### ◆ पोलीसांचा कडक बंदोबस्त

या दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस प्रशासनाने कडक बंदोबस्त ठेवला होता. थानेदार रविंद्र लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी दक्षता घेत परिसरात शांतता राखली.

एकूणच आलेगावात ईद-उल-फितरचा सण आनंद, उत्साह आणि सामाजिक ऐक्याच्या वातावरणात शांततेत पार पडला.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शनिवार, दि. २१ मार्च २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

## शासकीय तंत्रनिकेतन येथे राज्यस्तरीय प्रकल्प स्पर्धा

प्रतिनिधी २१ मार्च

**यवतमाळ :** महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाद्वारे आयोजित राज्यस्तरीय प्रकल्प स्पर्धा २०२५-२६ दि. १८ मार्च रोजी शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ येथे यशस्वीरीत्या संपन्न झाली. स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात प्रमुख उद्घाटक म्हणून विभागीय कार्यालय, अमरावतीचे प्र. संचालक डॉ. व्ही. आर. मानकर तसेच प्रमुख अतिथी म्हणून आरबीटीई नागपूरचे सहायक सचिव डी. एच. लिल्हारे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्पर्धेच्या परीक्षक मंडळात प्राचार्य डॉ. सुहास एस. गजरे, व्यवस्थापकीय संचालक, ॲपल केमि इंडिया प्रा. लि., नागपूर विवेक नाईक, मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्लोबल पॉवर इलेक्ट्रॉनिक्स, नागपूर संजय निचाट आणि सहयोगी प्राध्यापक व विभागाध्यक्ष, सिव्हिल इंजिनिअरिंग, जी.सी.ओ.ई. नागपूर डॉ. एस. एन. खांते यांचा समावेश होता.




■ **यवतमाळ :** यवतमाळ शहरातील कळंब चौकातील मस्जिदमध्ये आज रमजान ईदच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर मुस्लीम बांधव एकत्र आले होते. सकाळी मुस्लिम समाजाने मस्जिदमध्ये एकत्र येऊन नमाज अदा केली. नमाज अदा झाल्यावर एकमेकांना ईदच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. सामाजिक एकतेचे प्रतीक म्हणून या सणाच्या दिवशी धार्मिक उत्साह आणि शांतीचा माहौल दिसून आला.

# उत्तरवाढोणा येथे ३०० कोटींचा बायोगॅस प्रकल्प

## पालकमंत्री ना. संजय राठोड यांचा पुढाकार; शेतकऱ्यांनाही होणार फायदा

प्रतिनिधी २१ मार्च




**यवतमाळ :** नेर तालुक्यातील उत्तरवाढोणा येथे रिलायन्स इंडस्ट्रिज कंपनीच्या माध्यमातून सुमारे ३०० कोटी रुपयांचा कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सीबीजी) प्रकल्प उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे यवतमाळ जिल्हा बायोगॅस निर्मितीत आत्मनिर्भर होईल तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मोठा हातभार लागेल. या महत्त्वाकांक्षी उपक्रमासाठी पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी पुढाकार घेतला असून आज त्यांनी प्रकल्पाचा सविस्तर आढावा घेतला.

पालकमंत्री राठोड यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात शुक्रवारी आढावा बैठक घेत प्रकल्पाला गती देण्याचे स्पष्ट निर्देश दिले. बैठकीत निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, गटविकास अधिकारी, सरपंच तसेच रिलायन्स कंपनीचे अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्र्यांनी ग्रामसभा आयोजित करून स्थानिकांना प्रकल्पाची सविस्तर माहिती देण्याचे, त्यांच्या शंकांचे निरसन करण्याचे तसेच स्थानिकांना विश्वासात घेऊन समन्वयाने काम करण्याचे निर्देश दिले. या प्रकल्पाच्या ठळक वैशिष्ट्यांमध्ये इंधन आत्मनिर्भरता, शेतकऱ्यांना थेट फायदा, रोजगार निर्मिती, पर्यावरणपूरक उपाय आणि प्रशासनाचे सहकार्य यांचा समावेश आहे. प्रकल्पाद्वारे जिल्ह्यातच बायोगॅस निर्मिती होईल, त्यामुळे बाहेरील इंधनावरचे अवलंबित्व कमी होईल. शेतीतील पेंढा, शेण, ऊसाचा कचरा इत्यादीचा वापर करून गॅस तयार केला जाणार असल्याने शेतकऱ्यांना कचऱ्याचा योग्य दर मिळेल. यामुळे सुमारे २०० थेट आणि १५०० अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार आहेत. कचऱ्याचा पुनर्वापर करून इंधन निर्माण केल्याने प्रदूषण कमी होईल, तर प्रशासन वीज, पाणी व इतर पायाभूत सुविधा उपलब्ध करून देईल.

सध्याच्या जागतिक परिस्थितीत इंधन टंचाई व दरवाढीच्या पार्श्वभूमीवर हा प्रकल्प यवतमाळसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो. हा उपक्रम पर्यावरणपूरक असून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणारा आणि जिल्ह्यासाठी इंधन आत्मनिर्भरतेला चालना देणारा ठरणार आहे. पालकमंत्री राठोड यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी त्वरित कारवाई करण्याचे निर्देश दिले.

# पंपधारक शेतकऱ्यांकडे ९५ कोटी ६२ लाखांची थकबाकी

प्रतिनिधी २१ मार्च

**यवतमाळ :** यवतमाळ जिल्ह्यातील ७.५ एचपी किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेच्या कृषीपंपधारक शेतकऱ्यांकडे तब्बल ९५ कोटी ६२ लाख रुपयांची वीजबिल थकबाकी आहे. महावितरणकडून या थकबाकी वसुलीसाठी मार्च महिन्यात विशेष मोहीम राबविली जात आहे. या मोहिमेत कर्मचारी घरोघरी जाऊन थकीत वीजबिल वसुली करत आहेत, तसेच शेतकऱ्यांना तातडीने बिल भरण्याचे आवाहन केले जात आहे.

महावितरणचे मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी सांगितले की, 'बळीराजा मोफत वीज योजना' ७.५ एचपीपेक्षा कमी क्षमतेच्या पंपधारकांसाठीच लागू आहे. मात्र ७.५ एचपी किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेच्या पंपधारकांना वीजबिल भरणे बंधनकारक आहे. थकीत वीजबिल भरण्यामुळे शेतकऱ्यांना भविष्यातील पुरवठा सुरळीत राहण्याची हमी मिळते, तसेच महावितरणकडून दिवसा वीजपुरवठा कायम ठेवता येतो.

राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना' राबविली जात आहे. या योजनेअंतर्गत विकेंद्रीकृत स्वरूपातील सौर प्रकल्प, फिडर विलगीकरण, नवीन वीजवाहिन्या, रोहित्रे आणि उपकेंद्र उभारणीची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. परिमंडळातील सुमारे २ लाख ८० हजार शेतकऱ्यांपैकी जवळपास ७० टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठ्याचा लाभ मिळत आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील १ हजार ९७८ शेतकऱ्यांकडे थकीत वीजबिल असून, जिल्ह्यातील एकूण ७.५ एचपीपेक्षा जास्त क्षमतेच्या ६,०७६ कृषीपंपधारक शेतकऱ्यांपैकी हा मोठा हिस्सा आहे. महावितरणकडून थकबाकीदार शेतकऱ्यांना वेळेत बिल भरण्यासाठी आवाहन करण्यात आले आहे. थकबाकी वसुलीमुळे शेतकऱ्यांचा दिवसा वीजपुरवठा सुरळीत राहण्यास मदत होईल, तसेच महसूल वीज वितरण यंत्रणेच्या सुधारणा सुलभ होतील.

या मोहिमेअंतर्गत महावितरणकडून शेतकऱ्यांचे सहकार्य मिळणे आवश्यक असल्याचे अधोरेखित केले गेले आहे, ज्यामुळे जिल्ह्यातील कृषी क्षेत्रातील वीजपुरवठा आणि आर्थिक व्यवहार सुरळीत होईल.

# धारधार शस्त्र बाळगणारा इसम ताब्यात

प्रतिनिधी २१ मार्च



**उमरखेड :** दराटी पोलीस स्टेशनने एक महत्वाची कारवाई करत बेकायदेशीरपणे धारधार शस्त्र बाळगणाऱ्या इसमाला ताब्यात घेतले आहे.

पोलीस स्टेशन दराटीला माहिती मिळाली होती की, घडोळी, वाल्तुर चौफुली परिसरातील एक इसम सार्वजनिक ठिकाणी हातामध्ये धारधार शस्त्र, लोखंडी गुप्ती बाळगून धुमधाम करत फिरत आहे. या माहितीवर त्वरित कार्यवाही करत पोलीस ठाण्याचे ठाणेदार साहेब व पोलीस स्टाफ पंचासमक्ष त्या इसमाला ताब्यात घेतले. या इसमकडून अंदाजे १५०० रुपयांचे धारधार शस्त्र, लोखंडी गुप्ती जप्त करण्यात आले. संबंधित आरोपीवर पोलीस स्टेशन दराटीतर्फे अपराधिक क्र. ४७/२०२६ कलम ४.२५ भारतीय हत्यार कायदा १९५९, तसेच कलम ३७(१), १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीच्या विरोधात पुढील तपास पो.हवा/२१२ गजानन डोंगरे करीत आहेत. ही कार्यवाही पोलीस अधिक्षक कुमार चिंता, अप्पर पोलीस अधिक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि प्रसेनजित जाधव, पोलीस स्टेशन दराटी, पो. हवा/२१२ गजानन डोंगरे, पो.को/२४१ सिध्दार्थ कांबळे, पो. को/१८७६ रमेश पाटील, पो.को/१८१० संदीप हानवते, पो.को/१८०५ इंदल राठोड, मपोकॉ/२५३५ अश्विनी शिंदे यांनी केली आहे.

# तुती लागवड व रेशीम उद्योगासाठी अर्थसहाय्य मिळणार

प्रतिनिधी २१ मार्च

**यवतमाळ :** जिल्ह्यात तुती लागवड व रेशीम उद्योगाला चालना देण्यासाठी रेशीम संचालनालय, नागपूर यांच्या माध्यमातून 'महा रेशीम 2026' अभियान राबविण्यात येत आहे. 4 फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या या अभियानांतर्गत शेतकऱ्यांना रेशीम शेतीबाबत माहिती देऊन नवीन लाभार्थी तयार करण्यावर भर दिला जात आहे. संचालक, रेशीम संचालनालय यांच्या निर्देशानुसार ज्या गावांमध्ये यापूर्वी तुती लागवड व रेशीम उद्योग राबविण्यात आला आहे, त्या गावांमध्ये शिबिरे आयोजित करून नव्या शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले जात आहे. तसेच लगतच्या गावांमध्येही या योजनेचा विस्तार करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना ऑनलाइन अर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, अर्ज करताना आधार कार्ड, सातबारा उतारा, 8-अ सही नमुना तसेच तुती लागवडीच्या क्षेत्राचे छायाचित्र अपलोड करणे आवश्यक आहे. नोंदणी शुल्क म्हणून 559 रुपये (जीएसटीसह) ऑनलाइन जमा करावे लागतात. अर्जांची छाननी जिल्हा रेशीम अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येऊन त्यानंतर मान्यता दिली जाते. सध्या जिल्ह्यात 654 शेतकऱ्यांकडे 749.50 एकर क्षेत्रावर तुती लागवड आहे. सन 2026-27 साठी आतापर्यंत 89 शेतकऱ्यांनी 94 एकर क्षेत्रासाठी नोंदणी केली असली, तरी जिल्ह्यास 300 एकर लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा रेशीम अधिकारी सुनीलदत्त प्रभाकर फडके यांनी दिली मनरेगा अंतर्गत तुती लागवड, जोपासना व रेशीम किटक संगोपन गृहासाठी तीन वर्षांत 4 लाख 32 हजार रुपयांची मदत दिली जाते. तसेच 'सिल्क समग्र-2' या केंद्र पुरस्कृत योजनेतून सर्वसाधारण प्रवर्गासाठी 75 टक्के अनुदान उपलब्ध आहे.

# १४ व्या वर्षी गिरीराज मुक्कावार यांनी लिहिले 'श्रीकृष्ण: जीवनाचा मार्गदर्शक' पुस्तक

**इंग्रजी व मराठी अनुवाद**

प्रतिनिधी २१ मार्च



**उमरखेड :** इयत्ता 9 वी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकत असलेला मुळचा ब्राम्हणगाव येथील रहिवासी असलेला गिरीराज लक्ष्मीकांत मुक्कावार याने Shri Krishn - the life Guide हे पुस्तक लिहिले आहे . याची मराठी अनुवादीत आवृत्ती श्रीकृष्ण : जीवनाचा मार्गदर्शक हे दोन्ही पुस्तके नुकतेच प्रकाशित झाली असून वयाच्या 14 व्या वर्षी अध्यात्मिक ज्ञानामृत सेवन करून त्याने लिहीलेल्या इंग्रजी पुस्तकाची मराठीतही अनुवादित आवृती प्रकाशित केल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे . संस्कार पोद्दार लर्न स्कूल, उमरखेड येथील संस्कार पोद्दार लर्न स्कुल उमरखेड येथे इयत्ता नववीमध्ये शिकत असलेला 14 वर्षीय विद्यार्थी गिरीराज लक्ष्मीकांत मुक्कावार याने अगदी कोवळ्या वयातच साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत Shri Krishn: The Life Guide हे पुस्तक लिहिले आहे. भगवान श्रीकृष्ण यांच्या जीवनातील तत्त्वज्ञान, आदर्श आणि जीवनमार्ग यावर आधारित हे पुस्तक इंग्रजी भाषेत लिहिण्यात आले आहे. इतकेच नाही तर या इंग्रजी पुस्तकाची मराठी आवृत्ती श्रीकृष्ण : जीवनाचा मार्गदर्शक या पुस्तकाची मराठी अनुवादित आवृत्ती लिहून ही दोन्ही पुस्तके नुकतीच प्रकाशित झाली आहे. ही दोन्ही पुस्तके विद्यार्थ्यांसह सर्व वाचकांसाठी प्रेरणादायी आणि मार्गदर्शक ठरणारी आहेत. बाल साहित्यिक गिरीराज लक्ष्मीकांत मुक्कावार यांनी लिहिलेले हे पुस्तक नेशन प्रेस या प्रकाशन संस्थेमार्फत प्रकाशित करण्यात आले आहे. वयाच्या 14 व्या वर्षी इतक्या सखोल आणि आध्यात्मिक विषयावर साहित्य लेखन करून त्यांनी शाळेचा तसेच उमरखेड तालुक्याच्या साहित्यिक वैभवात मानाचा तुरा खोवला आहे. त्यांच्या या साहित्यिक कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत असून या निर्मिती यशामागे त्यांच्या वडील लक्ष्मीकांत मुक्कावार व आई ज्योत्स्ना मुक्कावार , गुरुजन तसेच वडीलधाऱ्या मंडळीचे मोठे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले आहे.

# महाड चवदार तळे सत्याग्रह शिल्पाकृतीला अभिवादन

प्रतिनिधी २१ मार्च



**यवतमाळ :** वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सर्व कार्यकर्त्यांनी यवतमाळ येथील दर्डानगर चौकात उभारलेल्या महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या शिल्पाकृतीला अभिवादन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २० मार्च १९२७ रोजी केलेल्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाला ९९ वर्षे पूर्ण झाली आहेत. या ऐतिहासिक दिनी सामाजिक समता आणि समतामूलक समाजनिर्मितीच्या उद्दिष्टाचा आढावा घेणे आणि बदललेल्या परिस्थितीवर गंभीर विचार करणे गरजेचे असल्याचे उपस्थितांनी सांगितले.या कार्यक्रमात रुपेश वानखडे, जिल्हा सरचिटणीस, भारतीय बौद्ध महासभा यवतमाळ यांनी आचार, विचार, प्रचार, संघटन आणि संघर्ष या पंचसूत्रीची महत्त्वपूर्ण मांडणी केली. मा. मीराताई वीर, नगरसेविका, न.प. यांनी दिनविशेषावर प्रकाश टाकला.याप्रसंगी डॉ. नीरज वाघमारे, जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी यांनी उपस्थितांना आवाहन केले की, श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकरांनी नागपूर येथील आर.एस.एस. मुख्यालयावर आयोजित मोर्चात सहभागी होणे हे आपले सामाजिक दायित्व आहे. मानव मुक्तीच्या चळवळीत सक्रिय न झाल्यास सामाजिक जबाबदारी पूर्ण केली जात नाही; त्यामुळे सर्वांनी २३ मार्चला नागपूर येथील मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमात रुपेश पिसे, अशोककुमार कयापाक, सचिन राऊत, दीपक नगराळे, शैलेश भानवे, देवानंद लोणारे, उत्तम कांबळे, रामदास वीर, गजानन कोकाटे, भारती सावते, करुणाताई चौधरी, आशाताई नगराळे यांच्यासह असंख्य नागरिक उपस्थित होते. हा कार्यक्रम सामाजिक न्याय आणि समतेच्या विचारांना प्रोत्साहन देणारा ठरला, तसेच महाड चवदार तळ्याच्या सत्याग्रहाच्या आदर्शाला युवा पिढीपर्यंत पोहोचवण्याचे कार्य केले.

# ९ वर्षांच्या आहिल महेमूद सोलंकीची प्रेरणादायी कामगिरी

## ३० रोजे सलग रोजा पूर्ण करून मोडला बाबांचा रेकॉर्ड

प्रतिनिधी २१ मार्च

**आर्णी :** शहरातील सामाजिक कार्यकर्ते महेमूद सोलंकी यांचे चिरंजीव, अवघ्या ९ वर्षांचा आहिल महेमूद सोलंकी यांनी आपल्या जिद्द, चिकाटी आणि अटळ श्रद्धेच्या बळावर रमजान महिन्यात पहिल्याच वर्षी संपूर्ण ३० रोजे रोजा ठेवून एक प्रेरणादायी कामगिरी केली आहे. एवढ्या लहान वयात केलेली ही साधना संपूर्ण समाजासाठी आदर्श ठरत आहे.

रमजान महिन्यात रोजा ठेवणे मोठ्यांसाठीही आव्हानात्मक असते; अशा परिस्थितीत आहिलने सलग ३० रोजे रोजा पूर्ण करत आपल्या बाबांचा रेकॉर्ड मोडला. त्याच्या या कामगिरीमुळे कुटुंबीयांसह संपूर्ण परिसरातून त्याचे कौतुक होत आहे. आहिलने केवळ धार्मिक कर्तव्य पार पाडले नाही, तर संयम, शिस्त आणि आत्मविश्वास यांचे उत्तम उदाहरणही समाजासमोर ठेवले आहे. त्याच्या या यशामुळे इतर लहान मुलांमध्येही प्रेरणा निर्माण होत असून, अनेकजण त्याचे अनुकरण करण्यास उत्सुक आहेत. या यशामागे त्याच्या कुटुंबाचे मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि संस्कार मोठी भूमिका बजावले आहेत. सामाजिक कार्यात सक्रिय महेमूद सोलंकी यांच्या कुटुंबात धार्मिक व सामाजिक मूल्यांना विशेष महत्त्व दिले जाते, याचे हे उत्तम उदाहरण आहे. आर्णी शहरात सध्या आहिलच्या या कर्तृत्वाची चर्चा सर्वत्र आहे, आणि त्याच्या जिद्दी व श्रद्धेचे सर्वजण मनापासून कौतुक करत आहेत. भविष्यातही तो अशाच प्रकारे प्रगती करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



# जागतिक ग्राहक हक्क दिन ; नागरिकांनी मांडल्या समस्या

प्रतिनिधी २१ मार्च

**उमरखेड :** जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त उमरखेड तहसील कार्यालयात १७ मार्च रोजी ग्राहक दिनाचा कार्यक्रम पार पडला. १५ मार्च रविवार असल्याने हा कार्यक्रम मंगळवारी आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे तालुका अध्यक्ष प्रा. प्रकाश देशमुख उपस्थित होते.

व्यवस्थापन व्यासपीठावर तहसीलदार राजेश सुरडकर, ग्राहक पंचायतचे कार्याध्यक्ष ॲड. विलासराव देवसरकर, उपाध्यक्ष दत्ता गंगासागर, सचिव रतिराज बोरगडे, कोषाध्यक्ष यशवंत गिरी उपस्थित होते. प्रास्ताविकात ॲड. विलासराव देवसरकर यांनी नागरिकांच्या जागरूकतेची गरज अधोरेखित करत सांगितले की, नागरिक सजग नसल्यामुळे अनेक ठिकाणी पिळवणूक होत आहे आणि प्रशासकीय यंत्रणेच्या विलंबामुळे समस्या तातडीने सुटत नाहीत. तहसीलदार राजेश सुरडकर यांनी ग्राहक दिन औपचारिकतेपुरता मर्यादित न ठेवता तक्रारींवर त्वरित उपाय करण्यावर भर दिला आणि लोकशाही दिनात ग्राहक पंचायत कार्यकारिणीचा समावेश करण्याची सूचना केली. अध्यक्षीय भाषणात प्रा. प्रकाश देशमुख यांनी ग्राहक संरक्षण कायदा २०१९ असूनही नागरिकांवरील पिळवणूक सुरू असल्याची टीका केली. राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या निमित्ताने मांडलेल्या समस्यांवर अद्याप तोडगा निघाल्याबद्दल नाराजी व्यक्त केली आणि अनुपस्थित कार्यालय प्रमुखांना कारणे दाखवा




नोटीस बजावण्याची मागणी केली. कार्यक्रमात नागरिकांनी गॅस पुरवठा, पेट्रोल-डिझेल दर, अपूर्ण रस्ते, पाणी व वीजपुरवठा, नगरपालिका कर, दूषित पाणी, वाहतूक कोंडी, विद्यार्थ्यांच्या बस सुविधा, ज्येष्ठ नागरिकांच्या अडचणी अशा विविध प्रश्न मांडले. आगार प्रमुख कार्यालयाचे प्रतिनिधी, तालुका कृषी अधिकारी, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे उपअभियंता, वजनमापे विभाग, एपीएमसी, भारत पेट्रोलियम, खरेदी-विक्री संघ, पुरवठा विभाग, तहसील कार्यालय, सेतू कार्यालय तसेच ग्राहक पंचायत पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन संदीप गाडगे यांनी केले तर अहवाल लेखन अमोल महाजन यांनी केले. नागरिकांच्या तातडीच्या समस्यांवर कार्यवाही करण्याची अपेक्षा या कार्यक्रमात व्यक्त करण्यात आली.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
शनिवार दि. २१ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com







## सुनावणी, माहिती अधिकार, तक्रारीसह अनेक प्रकरणे...

# प्रलंबित ठेवण्यात 'आकाशभरारी'!


*** शिक्षण विभागात कायद्याचे उल्लंघन * उपशिक्षणाधिकाऱ्याकडून भ्रष्टाचाराचे अवलंबन**


● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीमच्या माध्यमिक शिक्षण विभागात मागील अनेक वर्षापासून सुनावणीचे शेकडो प्रकरणे धुळखात पडलेली आहेत.सोबतच अनेक माहिती अधिकारा अंतर्गत मागितलेल्या माहिती संदर्भातील अनेक प्रकरणे कथित उपशिक्षणाधिकाऱ्याने प्रलंबित ठेवण्याचा महापराक्रम केल्याची शिक्षण विभागात चर्चा आहे. या अभिनव फंड्यातून कथित उपशिक्षणाधिकाऱ्याने मोठ्या प्रमाणात 'माया' जमा केल्याची नाराज मंडळीमध्ये चर्चा आहे.या सर्व गैरप्रकाराला वरिष्ठांची 'साथ' असून लोकप्रतिनिधींनी सुद्धा मौनव्रत धारण केल्याचे चित्र आहे.कथित उपशिक्षणाधिकाऱ्याने कार्यालयातील धुळखात ठेवण्यासाठीही आकाशभरारी घेतल्याची चर्चा आहे.



ाशीमच्या माध्यमिक विभागाला माहितीच्या अधिकारा अंतर्गत मागितलेल्या शेकडो अर्जांचा गठ्ठा कार्यालयात धुळखातं पडलेला आहे. याची नोंद कार्यालयातील आवक नोंदवहीमध्ये नमूद केलेली आहे. वाशीम जिल्ह्यातील अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये कार्यकारिणीतील गटा-गटांमध्ये वाद सुरू असल्याचा फायदा शिक्षण विभागातील झारीतील शुक्राचार्यांनी घेतला आहे. तसेच संस्थाचालकांनी ,मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीबाबत कथित उपशिक्षणाधिकाऱ्यासह आजी-माजी माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी सुनावणी घेवून अद्यापही शेकडो प्रकरणांचा निकालच दिला नसल्याची धक्कादायक माहिती प्राप्त झाली आहे. संस्थाचालकांच्या आपसी वादाचा फायदा घेवून संबंधित अधिकारी, उपशिक्षणाधिकारी एका गटाला झुकते माप देवून त्या गटाकडून मोठ्या प्रमाणात मलिदा लाटून प्रतिस्पर्धी गटाला न्यायालयाचा रस्ता दाखवत असल्याचे वास्तव शिक्षण विभागात सुरू आहे. झुकते माप देणाऱ्यांकडून विविध कामे मार्गी लावण्यासाठी लाखो रूपये घेवून प्रतिस्पर्धी गटाचे नुकसान करून त्यांना मानसिक, शारीरिक व आर्थिक त्रास देण्याचा फंडा शिक्षण विभागात बदनाम झालेले कथित अधिकारी वापरत असल्याची माहिती सुनावणीच्या निकालाच्या प्रतीक्षेत असलेल्या आणि माहितीच्या अर्जाची माहिती मिळण्याची वाट पाहणाऱ्या मंडळीकडून प्राप्त झाली आहे.



माध्यमिक शिक्षण विभागातील सुरु असलेल्या सावळागोंधळावर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी मौनव्रत धारण करून कथित अधिकाऱ्यांना खुलेआम लूट करण्यासाठी राजाश्रय दिला असल्याची चर्चा आहे.

## थोडक्यात

### प्रकल्प प्रदर्शनामध्ये जे.सी हायस्कूलच्या दोन प्रकल्पांची निवड



● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

राज्य शिक्षण संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे व जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने वाशिम, हिंगोली व नांदेड जिल्ह्यातील अटल टिंकलिंग लॅब अंतर्गत 'शिक्षक विद्यार्थी प्रकल्प प्रदर्शन' १७/३/२०२६ वार मंगळवार रोजी नांदेड या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते.या प्रदर्शनीमध्ये वाशिम, हिंगोली व नांदेड तीनही जिल्ह्यामधून २२ शाळांमधील ६४ शिक्षकांनी व ८८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.या प्रकल्प प्रदर्शनी मध्ये इलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिकल, डिजिटल लिटरसी व थीम बेस असे चार गट तयार करण्यात आले होते.या प्रकल्प प्रदर्शनामध्ये विद्यालयातील इलेक्ट्रॉनिक गटामध्ये 'डबल सेक्युरिटी लॉक सिस्टिम' जयराज देशमुख व ग्रंथ रेवाळे, मेकॅनिकल गटामध्ये ट्राय ?क्सिस मल्टी फंक्शनल स्टडी टेबल हा प्रकल्प वेदांत गुडे व सर्वेश राऊत, डिजिटल लिटरसी या गटामध्ये 'स्मार्ट पॉलिहाऊस असिस्टंट' सर्वेश बोन्ते व साईश वानखडे व तसेच थीम बेस प्रकल्पामध्ये 'सन कॅचेर सोलर सिस्टिम' हा प्रकल्प पवन थेर व जितेंद्र शिंदे या चारही प्रकल्पासोबत शिक्षक दिनेश पळसकर यांनी सहभाग घेतला होता. याकरता सहभागी शिक्षक दिनेश पळसकर व विकास काळे, 'लेंड अ हँड इंडीया' समनवयक राजेश चव्हाण व विद्यार्थी यांचे कारंजा एज्युकेशन सोसायटीचे सचिव अमलप्रभ चवरे, प्राचार्य भारत हरसुले , पर्यवेक्षक प्रशांत गंधक वयांनी कौतुक केले.

### रविवारी अकोला येथे वीरशैव वधु-वर परिचय मेळावा

**वाशीम :** वीरशैव लिंगायत समाज अकोला यांच्या पुढाकारातून व वीरशैव समाज महिला मंडळाच्या विशेष सहकार्यातून रविवार, २२ मार्च रोजी सकाळी ९ वाजता अकोला येथील सिव्हील लाईन स्थित जि.प. कर्मचारी भवनात भव्य वीरशैव वधु-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यातील समाजबांधवांनी या मेळाव्याचा लाभ घेण्याचे आवाहन वीरशैव लिंगायत समाजाचे उपाध्यक्ष डॉ. नितीन बिडवे यांनी केले आहे.या परिचय मेळाव्याच्या माध्यमातून विखुरलेल्या वीरशैव समाजाला एकत्र आणणे, पालक परिचय होणे, उपवधु-वर यांना परिचयासाठी प्रोत्साहित करणे हा उद्देश असल्याचे डॉ. नितीन बिडवे यांनी सांगीतले.






# भ्रष्टाचाराची 'सुविधा', मॅनेज 'निविदा'!

***कार्यकारी अभियंता मर्जीतल्या ठेकेदारास अग्रीम देवून धन्य**
***बांधकाम विभागातील सावळागोंधळ चव्हाट्यावर**
***कार्यकारी अभियंत्याला राजाश्रय**
***अनेक ठेकेदारांना कामे करूनही देयकांची प्रतीक्षा, अन् शिक्षा**
***शासकीय निवासस्थानाच्या देखभाल, दुरूस्तीत कोट्यवधीची अपेक्षा**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशीम येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जोशी यांनी स्थानिक शासकीय निवासस्थानाच्या देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी मर्जीतील ठेकेदारांना ६०३ रक्कम कामे सुरु होण्यापुर्वीच अग्रीम दिल्याने बांधकाम विभागातील गैरकारभार चव्हाट्यावर आला आहे.राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानसभेतील विरोधी पक्षनेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी तारांकीत प्रश्न उपस्थित करुन सत्ताधारी व जोशींच्या पाठीराख्यांना चपराक दिल्याची चर्चा आहे.

वाशीम येथे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता म्हणून पदभार घेण्याअगोदर सुद्धा शुभम जोशी यांची विभागातील कारकिर्द वादग्रस्तच होती असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. वाशीम येथील ३४ शासकीय निवासस्थानाची देखभाल, दुरूस्ती साठी प्रत्येकी १० लाख रूपयाप्रमाणे जिल्हा नियोजन समितीमधून या कामासाठी एकूण ३ कोटी ४० लाख रूपये मंजूर करण्यात आलेत. आलेला निधी परत जावू नये, आणि 'या' कामातून कोट्यवधीची कमाई करण्यासाठी कार्यकारी अभियंता जोशी आणि त्यांची मर्जी सांभाळणारे काही अधिकारी, कर्मचारी यांनी अभिनव योजना आखली.या अभिनव योजनेचा लाभ मर्जीतीलच ठेकेदारांना द्यायचा म्हणून सर्व मर्जीतील ठेकेदारांना ६०३ रक्कम कामे सुरू होण्यापुर्वीच अग्रीम देवून 'या' कामात भागिदारी ठेवून झटपट करोडपती होण्याचा महापराक्रम सुद्धा जोशींनी केल्याची बांधकाम विभागातच चर्चा आहे. एका शासकीय निवास स्थानाच्या देखभाल, दुरूस्तीसाठी दहा लाखाचा खर्च ही बाबही संशयास्पद आहे. या कामात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार सुरू असल्याचा आरोप कामे वाटतांना अन्याय झालेल्या ठेकेदारांकडून केल्या जात आहे. तर दुसरीकडे पोहरादेवी येथील ४०० कोटीच्या विकासकामात कार्यकारी अभियंता शुभम जोशी यांनी त्यांच्यावर कृपादृष्टी असलेल्या सत्ताधारी मंडळीच्या चेल्या, चपाट्यांना व मर्जीतील ठेकेदारांना ३०,४०, ५० लाखाचे तुकडे पाडून त्या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केल्याची बाब उजेडात आली आहे. यासंदर्भाने शुभम जोशी यांना वरिष्ठांसह



गुणवत्ता नियंत्रण अधिकाऱ्यांनी २० पत्रे देवूनही त्या पत्राची दखल घेतली नसल्याची बाब विधानसभेचे विरोधी पक्षनेते आमदार वडेट्टीवार यांनी अधिवेशनात तारांकीत प्रश्न उपस्थित करून सभागृहामध्ये सत्ताधाऱ्यांची पोलखोल केली.

या प्रकाराने शुभम जोशी, त्यांचे पाठीराखे सत्ताधारी आणि संगनमताने भ्रष्टाचार करणाऱ्या मंडळीमध्ये खळबळ उडाल्याचे वृत्त आहे.या सर्व भ्रष्टाचाराची एसआयटी मार्फत सखोल चौकशी करण्याची मागणी मागील अनेक वर्षापासून केलेल्या कामाची देयके मिळण्याची प्रतीक्षा करणाऱ्या ठेकेदारांकडून केल्या जात आहे.

## रिसोड शहरावर पाणी टंचाईचे संकट !

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

रिसोड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या आडोळ प्रकल्पात केवळ वीस टक्केच जलसाठा शिल्लक राहिला आहे अजून कडक उन्हाळ्याचे दोन महिने बाकी आहेत पाणी वापराचे नियोजन न केल्यास व जून महिन्यात पाऊस न पडल्यास शहरात भीषण पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे .

पाणी जपून वापरण्याचे आवाहन नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे गत दोन ते अडीच दशकापूर्वी शहरवासीयांना पाणीटंचाईचा मोठा सामना करावा लागत होता उन्हाळ्यात तर भीषण पाणीटंचाई निर्माण होत होती ९० च्या दशकात करडा येथून शहराला पाणीपुरवठा करण्याचे प्रयत्न झाले परंतु त्यावेळी झालेला खर्च वाया गेला त्यानंतर सन २००० च्या दरम्यान स्व पूंडलीकराव गवळी यांच्या प्रयत्नाने आडोळ प्रकल्पावरून शहरा साठी कायम स्वरुपी पाणी पुरवठा व जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यात आले .शहराला पाणीपुरवठा करीत असताना पाणीपुरवठा विभागाला पाण्याचे वितरण करीत



असताना तारेवरची कसरत करावी लागत आहे अशाही परिस्थितीत पालिकेचे पाणी वितरण व्यवस्थेचे कर्मचारी अतिशय दक्षतेने झोन पाडून पाच दिवस आड शहरात पाणीपुरवठा करीत आहेत वाढत्या तापमानामुळे बाष्पी भवनाचे प्रमाण वाढले आहे तसेच या धरणातील पाण्याचा उपसा ही दररोज मोठ्या प्रमाणात असल्यामुळे पाणी पातळी झपाट्याने कमी झाली असून आज रोजी या प्रकल्पामध्ये केवळ वीस टक्केच जलसाठा शिल्लक असल्याचे पाणीपुरवठा विभागाचे अभियंता नंदकिशोर डाखोरे यांनी सांगितले आहे. पाणी जपून वापरण्याचे आवाहन नगर परिषदेचे अध्यक्ष भगवानराव क्षीरसागर, व मुख्याधिकारी सतीश शेवदा , पाणीपुरवठा विभागाचे सभापती संजय बगडिया यांनी केले आहे.

## चिखली येथे समाधान शिबिराचे आयोजन

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागातर्फे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा क्रमांक १, मौजे चिखली तालुका- रिसोड येथे २० /३/ २०२६ रोजी आयोजित करण्यात आले. सदर शिबिरास नागरिक व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

सदर शिबिर अभियानास मा. उपविभागीय अधिकारी वाशिम श्रीमती वैशाली देवकर, तहसीलदार रिसोड सौ. प्रतिक्षा तेजनकर, मा.किरणराव सरनाईक आमदार शिक्षक मतदार संघ, मा.श्री. वैभव सरनाईक सभापती कृषी जि.प. वाशिम, मा.स्वप्निल सरनाईक माजी. जि.प. सदस्य वाशिम. रावसाहेब देशपांडे निवासी नायब तहसीलदार रिसोड, गजानन जवादे निवडणूक नायब तहसीलदार, यांची





प्रमुख उपस्थिती लाभली ग त्यावेळी मंडळ अधिकारी कवठा तसेच सर्व कवठा मंडळातील ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक आणि कवठा मंडळातील सर्व सरपंच, पोलीस पाटील हे उपस्थित होते सामाजिक वनीकरण विभाग रिसोड, राज्य परिवहन मंडळ, राज्य महावितरण महामंडळ तसेच तहसील कार्यालय रिसोड येथील सामाजिक अर्थसाह्य योजना व पुरवठा विभागातील विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या शिबिरामध्ये नागरिकांना विविध शासकीय सेवा व सुविधा देण्यात आल्या यामध्ये जातीचे दाखले ३६ रहिवासी दाखले४०, उत्पन्न दाखले ५० नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र २३ लक्ष्मी मुक्ती योजना ०५, फेरफार ७५ ७/१२उतारे१९५ संजय गांधी योजना प्रकरणे ३४ पानंद रस्ते आदेश ०२ सलोखा योजना०१ महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १५५ नुसार ७/१२ दुरुस्ती१५६ जिवंत सातबारा अंतर्गत वारसा नोंदी १७८ असे शिधा पत्रिका वाटप ७० अशा विविध महसूल व इतर कार्यालयशी संबंधित कामे या शिबिरामध्ये करण्यात आली. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्राम महसूल अधिकारी स्वप्निल धांडे यांनी केले तर सूत्रसंचालन श्रीमती गौरी काष्टे यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्या करिता मंडळ अधिकारी श्री. गजानन गरकळ, ग्राम महसूल अधिकारी, सडके , गिरी, सौ.पुरोहित मॅडम, रुपेश मुलगे, आणि सर्व महसूल सेवक कवठा यांनी परिश्रम घेतले, व कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, महिला व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चिखली येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत केलेला सेल्फी पॉईंट खूप छान पद्धतीने महसूल विभागाच्या वतीने करण्यात आले.

# वाशीम जिल्ह्यात रमजान ईद उत्साहात साजरी !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

दरवर्षीप्रमाणे यंदाही ईद-उल-फित्र हा पवित्र सण देशभरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वाशीम जिल्ह्यातही मुस्लिम बांधवांनी मोठ्या आनंदात आणि धार्मिक वातावरणात रमजान ईद साजरी केली. सकाळपासूनच ईदगाह परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. यावेळी मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव नमाज अदा करण्यासाठी



एकत्र आल्याचे दिसून आले.

वाशीम शहरातील ईदगाहवर सकाळी ९:३० वाजता ईद-उल-फित्र अर्थात रमजान ईदची सामूहिक नमाज अदा करण्यात आली. नमाज पठणानंतर जगात शांतता, सौहार्द आणि बंधुभाव नांदावा यासाठी विशेष दुआ करण्यात आली. त्यानंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना गळाभेट देत 'ईद मुबारक'च्या शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव ईदगाहवर एकवटले होते. नवीन कपडे, अत्तराचा सुगंध आणि आनंदी वातावरणामुळे परिसरात सणाचा खास रंग दिसून येत होता. वाशीम शहरासह



रिसोड, मालेगाव, मंगरूळपीर, कारंजा आणि मानोरा तालुक्यातही रमजान ईद शांततेत आणि उत्साहात साजरी करण्यात आली.

सर्वत्र बंधुभाव, एकता आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, सणाच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाकडून ईदगाह तसेच शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. वाशीम जिल्ह्यात रमजान ईदचा सण उत्साह, आनंद आणि शांततेच्या वातावरणात साजरा झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

## नांदखेडा येथे रामनवमी उत्सवाला सुरुवात !

● सिटी न्युज ब्युरो @ शेलुबाजार ●

भगवान मुंगसाजी महाराज यांच्या आशिर्वादाने आणि स्व. गुणवंतराव जायभाये व स्व.सखुबाई गुणवंतराव जायभाये यांच्या प्रेरणेने सलग ३७ वर्षापासून नांदखेड येथे गुढीपाडवा पासून रामनवमी पर्यंत हा उत्सव मोठ्या आनंदात दरवर्षी साजरा होत असतो. सलग नऊ दिवस भगवान मुंगसाजी महाराज ग्रंथाचे वाचन विठ्ठलराव राऊत महाराज माळशेलू हे करीत असतात.भाविक मोठ्या आनंदात श्रवण करीत असतात.दररोज सकाळ आणी संध्याकाळी भाविक भक्तासाठी महाप्रसादाचे आयोजन केले जाते.भाविक भक्तगण मोठ्या आनंदात महाप्रसादाचे सेवन करतात.दररोज



संध्याकाळी भजन कीर्तन सेवा मोठ्या आनंदात पार पाडली जाते.संत निळोबा माऊली दररोज सकाळी काकड आरती आणि संध्याकाळी हरिपाठ सेवा देतात. रामनवमीच्या दिवशी सर्व भाविकांसाठी पुरण पोळीचा महाप्रसादाचे आयोजन केले जाते.सर्व नांदखेडा आणि माळशेलू येथील भाविक श्रमदान देऊन मोठया आनंदाने महाप्रसादाचे सेवन करतात. रामनवमीच्या दुसऱ्या दिवशी गोपाल काल्याचे आयोजन करून कार्यक्रमाचा समारोप आनंदात केला जातो.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शनिवार, दि. २१ मार्च २०२६
http://epaper.citynewssuperfast.com





# सहकार विभागाने केली लोकशाहीची हत्या

## ▶▶ अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा इलेक्शन घोटाळा
## ▶▶ संचालक पदाच्या उमेदवारावर कोणी आणले प्रेशर...!

प्रतिनिधी २१ मार्च

**अकोला :** जिल्हा उपनिबंधक सहकार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असलेल्या अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सार्वत्रिक निवडणूकीत जिल्हा बँकेचे अध्यक्ष व संचालक पदाचे (पगारदार मतदार संघ) उमेदवार संतोष कोरपे यांच्या विरोधात उभे राहिलेल्या प्रा. अतुल पिलात्रे यांच्यावर प्रेशर आणुन, दबाव टाकत, बिनविरोध निवडणुक करण्यासाठी त्यांना अर्ज मागे घेण्यास भाग पाडल्याची माहिती आहे. या सर्व प्रकरणात सहकार खात्यातील लोकशाही प्रक्रियेला पुर्णतः छेद देण्यात आला. इतकेच नाही तर लोकशाही परंपरेला तिलांजली दिल्या गेली. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी दूपारी ३ वाजेपर्यंतची अर्ज मागे घेण्याची वेळ असताना सायंकाळी ५.४५ वा. उमेदवारी अर्ज कुठल्या आधारावर मागे घेतला गेला, कोणाच्या दबावाखाली घेतला गेला, याची चौकशी होण्याची गरज आहे.

या सर्व प्रकरणात उमेदवारी अर्ज मागे घेण्याची वेळ ही दूपारी ३ असताना सायंकाळी ५.४५ वा. अतुल पिलात्रे यांचा उमेदवारी अर्ज मागे कसा घेतला गेला. दू.३ नंतर आलेल्या उमेदवाराचा अर्ज आम्ही मागे घेणार नाही अशी ताठर भूमिका सहकार खात्याने का दाखविली नाही अशी विचारणा होत आहे. निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून जिल्हा उपनिबंधक गीतेशचंद्र साबळे यांची भूमिका या सर्व प्रकरणात तपासली पाहिजे. तसेच या सर्व प्रकरणाची चौकशी जिल्हाधिकाऱ्यांनी करण्याची गरज आहे. कायदा धाब्यावर बसवित लोकशाही मार्गेने होणाऱ्या निवडणुका दबावाच्या आधारे होणार असतील तर महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याचा बिहार झाल्याचे चित्र आता तरी पुसण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

सिटी न्यूज सुपरफास्टने जिल्हा उपनिबंधक आणि निवडणूक निर्णय अधिकारी गीतेशचंद्र साबळे यांना या विषयी विचारणा केली. त्यांनी संचालक पदाच्या उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी बुधवार, १८ मार्च रोजी दू.३ वाजता आमच्या आर ओंच्या उपस्थितीत त्यांनी स्वतः प्रा. अतुल पिलात्रे यांचा अर्ज मागे घेतला. वेळेतच अर्ज मागे घेतला असेल, असे गीतेशचंद्र साबळे यांनी सिटी न्यूज सुपरफास्ट सोबत बोलताना सांगितले. त्यांना वारंवार असेल असा शब्द प्रयोग तुम्ही करत आहात या विषयी विचारणा केली. तर त्यांनी हो वेळतच अर्ज मागे घेतला गेला असेल असा पुर्नउच्चार जिल्हा उपनिबंधक व निवडणुक निर्णय अधिकारी गीतेशचंद्र साबळे यांनी स्पष्ट केले. तर आमच्या कार्यालयाचे (जिल्हा उपनिबंधक) सीसीटीव्ही सुरु असल्याचा दावा त्यांनी केला. या सर्व निवडणुक प्रक्रियेचा तपास राज्य सरकारने करण्याची गरज आहे. इतकेच नाही तर खदान पोलिसांनी तत्काळ जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील सीसीटीव्ही जप्त करण्याची गरज व्यक्त केली जात आहे. त्याच बरोबर संचालक पदाच्या निवडणुकीत दू.३ नंतर उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी ५.४५ वा. कुठल्या आधारावर उमेदवारी अर्ज मागे घेतला गेला. जेव्हा की उमेदवारी अर्ज मागे घेण्याची वेळ ३ वाजताची होती. हा सर्व प्रकार लोकशाही व्यवस्था, निवडणुक व्यवस्थेची हत्या करणारा असून या सर्व प्रकरणाची फौजदारी चौकशी करण्याची गरज आहे.

त्याच बरोबर अकोला वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणुकीत झालेल्या या गैरप्रकाराची त्याच बरोबर सर्व उमेदवारांच्या मोबाईलचे कॉल डिटेल्स चेक केल्यास यातील घोळ आणि त्या पाठिमागे कोण याचा खुलासा होईल. दरम्यान, प्रा.अतुल पिलात्रे यांच्याशी संपर्क केला असता त्यांचा मोबाईल बंद होता.

### दहा मतदार संघात बिनविरोध कसे ?

दि. अकोला - वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अकोला व्यवस्थापन समिती निवडणुक २०२६ -२०३१ सुरु आहे. अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या २१ संचालक पदांच्या निवडणुकीत दहा उमेदवारांची बिनविरोध निवड झाल्याचा दावा करण्यात येत आहे. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी शुक्रवारी २० मार्च प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुसार २३ उमेदवार रिंगणात असल्याचे चित्र स्पष्ट झाले. अकोला- वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या २१ संचालक पदांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी मागे घेण्याची मुदत १८ मार्च रोजी दुपारी तीन वाजता संपुष्टात आली. ५५ उमेदवारांनी माघार घेतली असून, दहा मतदारसंघांत प्रत्येकी एकमेव उमेदवारी अर्ज शिल्लक राहिल्याने दहा उमेदवारांची बिनविरोध निवड झाली. असा दावा केला जात आहे.

### निवडणुक टाळण्यासाठीचा खटाटोप

लोकशाही व्यवस्थेत निवडणुक टाळण्यासाठी प्रतिस्पर्धी उमेदवारावर दबाव टाकत त्याला बसविण्याचा उद्योग या निवडणुकीत केला गेला. इतकेच नाही तर प्रा. पिलात्रे यांच्यावर ज्यांनी कोणी दबाव टाकला त्यांनी तरी किमान लोकशाहीच्या गप्पा करणे व सल्ले देणे थांबविले पाहिजे. लोकशाहीत निवडणुकीत कोण जिंकेल कोण पराभूत होईल हे मतदार ठरवतील. पण, केवळ अख्या आयुष्यात मी बिनविरोध निवडुन आलो ही शेखी मिरविण्यासाठी लोकशाही व्यवस्थेचा, सहकार विभागाचा, सहकारच्या निवडणुक प्रक्रियेचा गळा दाबला जात असताना प्रशासकीय यंत्रणा संस्था चालकांचे बटीक होऊन काम करत असतील तर लोकशाही व्यवस्था संपल्यात जमा झाल्याचे राज्य सरकारने घोषित करण्याची गरज आहे.

### हे राज्य सरकारचे अपयश

इतर कुठल्याही निवडणुका म्हटल्या की मोठ्या प्रमाणात निवडणुक आयोगावर ताशेरे ओढले जातात. पण, आता तर थेट सहकार विभागाच्या निवडणुका अशा मॅनेज होत असतील तर सहकार विभागाच्या निवडणुकांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्याची गरज आहे. अकोल्यातील झालेल्या या प्रकाराची स्वतंत्र चौकशी सहकार आयुक्तांनी करण्याची गरज आहे. नुसती चौकशी नाही तर भविष्यातील निवडणुकांची प्रक्रिया पारदर्शक व लोकशाही परंपरेनुसार करण्यासाठी कठोर पावले उचलण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

उमलत्या कळ्या
वाढदिवस



चि.हिमांश विनोद मोरे
रा. गुरुकुल नगरी, मलकापुर

# देव, देश आणि धर्म या संकल्पनेतून पाडवा उत्सवाचे सुरेख सादरीकरण

प्रतिनिधी २१ मार्च

**अकोला :** संस्कार भारती, अकोलाच्या वतीने गुढीपाडवा निमित्त नववषाचे स्वागत करण्यासाठी दरवर्षी प्रमाणे यावेळी पाडवा उत्सवातून भारतीय संस्कृतीचे नृत्य, गायन व वादनाच्या माध्यमातून सांस्कृतिक सोहळ्याचे सादरीकरण राजे छत्रपती संभाजी पार्क, जवाहर नगर येथे करण्यात आले. यात प्रभात कीड्स स्कूल, कथ्थक नृत्य मंदिर, संस्कृती नृत्य कला मंदिर, श्री नृत्य कला केंद्र व अभिनव कथ्थक नृत्य कला मंदिराच्या विद्यार्थीनीनी देव, देश आणि धर्म या कल्पनेतून अत्यंत सुरेख सादरीकरण केले.



या सोहळ्याचा प्रारंभ गुढी पुजन, आराध्य दैवत नटराज पुजन व संस्कार भारती ध्येय गीताने करण्यात आला. यावेळी जिल्हा पोलीस अधिक्षक अर्चित चांडक, डॉ. विनायक देशमुख, निकेश गुप्ता, सुनील इंदान्नी, शैलेश खरोटे, डॉ. गजानन नारे, प्रा. नितीन बाठे, अनिल गावंडे, आशिष पवित्रकार, राजन सोनटक्के, प्रा. संजय खडक्कार, सौ. प्रिती पाटील आदि मान्यवर उपस्थित होते. नृत्य शिक्षीका राधीका साठे, अमृता जोशी जटाळे, तृप्ती बोन्ते आणि रोशनी भांडेकर यांच्या विद्यार्थीनीनी अत्यंत सुरेख नृत्य सादर केली. यावेळी मान्यवरांच्या सत्काराबरोबर संस्कार भारतीच्या प्रा. डॉ. नाना भडके, प्रा. डॉ. रूपा ठाकरे आणि सौ. प्रांजल रायपुरे यानी विविध क्षेत्रात दिलेल्या अतुलनिय योगदाना साठी विशेष सत्कार करण्यात आला. विदर्भ प्रांताचे कार्याध्यक्ष सुधाकर अंबूसकर, जिल्हाध्यक्ष चंदाताई जयस्वाल, महानगर अध्यक्ष डॉ. आर. बी. हेडा आणि कार्यक्रम समन्वयक अशोक ढेरे यांच्या मार्गदर्शनात व श्रीकीसनजी जयस्वाल, प्रा. निनाद कुलकर्णी, प्रा. नाना भडके, आशा खोकले, प्रा. महेश मोडक, अविनाश परळीकर, सुधीर बचे, राजु उखळकर, प्रा. प्रकाश बोरकर,प्रा. रूपी ठाकरे, सुनिता लाजुरकर यानी यासाठी परीश्रम घेतले. वादक गोपाल राऊत, जयकुमार गुरू, अनिकेत अंबूसकर, साहील मालठाणकर, आनंद बोराटने, ऋग्वेद रानडे यांचे सुरेख वादन व गोपाल राऊत, गोपाल गावंडे, तृप्ती गोरे, प्राजक्ता चांडक, रसिका जयस्वाल, लता मोरखडे, मुक्ता पाटील, स्वाती काकड, शर्वरी वाघ, संज्योती कश्यपे, इशिता पुराउउपाध्ये, कीर्ती पिंपळकर व श्रावणी राजवैद्य यांच्या श्रवणीय गायनाने कार्यक्रम रंगतदार झाला. भाऊलाल देवतवाल, विभा जोशी, देहनकर, कोमल अंधारे व शितल जाट यांनी साकारलेल्या रांगोळीचे उपस्थित रसिकानी भरभरून कौतुक केले. अकोला संस्कार भारतीचे पालक विरेन चांडक खास या कार्यक्रमासाठी नागपूरहून आले होत. या सोहळ्याचे बहारदार सुत्र संचालन मोहीनी मोडक यांनी केले.



# बार्शीटाकळी येथे मते हॉस्पिटलचे शानदार लोकार्पण



प्रतिनिधी २१ मार्च

**बार्शीटाकळी :** २० मार्च रोजी येथे मते हॉस्पिटलचे लोकार्पण करण्यात आले. डॉ. प्रशांत आनंदराव मते (एमडी मेडिसिन) यांनी नाशिक येथून शिक्षण घेऊन प्रॅक्टिस केल्यावर स्वतःचे मते हॉस्पिटल कासम नाना चौकात लोकांच्या सेवेकरिता उघडले आहे. हॉस्पिटलचे उद्घाटन माजी मंत्री गुलाबराव गावंडे, प्रमुख अतिथी अकोला जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष अशोकराव अमानकर, अमरावती जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष सुरेखाताई ठाकरे, डॉ. दिलीप मोरे, डॉ. मिलिंद चौखंडे, डॉ. मालोकार, डॉ. प्रवीण पाटील, डॉ. जंजाळ, बार्शीटाकळीचे नगर अध्यक्ष नईम भाई व वासुदेव महाराज संस्थानचे अध्यक्ष वासुदेवराव महाले उपस्थित होते. एमडी मेडिसन डॉक्टर बार्शीटाकळी मध्ये कोणीच नव्हते. त्यामुळे शहर तसेच तालुक्यातील रूग्णांची सोय होणार आहे. अत्यावश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध झाल्यामुळे समाधान व्यक्त केले जात आहे. शुभारंभ प्रसंगी मान्यवर उपस्थित होते.




# वातावरणात बदल, प्रकृतीच्या तक्रारी

**अकोला :** काही दिवसातील वातावरणात झालेला बदल प्रकृती साठी डोकेदुखी ठरत आहे. तापमान वाढत असताना मधेच पाऊस पडतो. त्यामुळे अंगदुखी, डोकेदुखी, तापाचे रूग्ण दिसत आहे.




# शहरात रमजान ईद अत्यंत उत्साहात साजरी

## ◆हरिहरपेठेतील ईदगाहवर मुख्य नमाज संपन्न

प्रतिनिधी २१ मार्च

**अकोला :** एका प्रदीर्घ काळानंतर यावर्षी रमजानचे पूर्ण ३० उपवास (रोजे) झाले आहेत. त्यामुळे यावेळच्या रमजान ईदबाबत सर्व रोजेदारांमध्ये एक वेगळाच उत्साह पाहायला मिळाला. रमजान ईद ही अल्लाहकडून रोजेदारांना मिळणारी एक विशेष भेट मानली जाते. ?आज जुन्या शहरातील हरिहरपेठ परिसर, अकोट फाईल येथील नायगाव ईदगाह मैदान, आणि खदान येथील ईदगाह मैदानासह शहरातील सर्व प्रमुख मशिदींमध्ये ईदची नमाज अदा करण्यात आली.



या नमाजसाठी हजारोच्या संख्येने नागरिक उपस्थित होते. नमाजपूर्वी शहराच्या मोहम्मद अली रोड परिसरातून पवित्र 'निशान' मिरवणुकीने काढण्यात आले. हरिहरपेठ येथील ऐतिहासिक ईदगाहवर हे निशान पोहोचल्यानंतर ईद-उल-फितरची मुख्य सामूहिक नमाज पार पडली. शहरातील सर्वच ईदगाह मैदानांवर मोठी गर्दी दिसून आली. नवीन कपडे, अत्तराचा दरवळ आणि उत्साहपूर्ण वातावरणामुळे संपूर्ण परिसर ईदच्या रंगात न्हाऊन निघाला होता. नमाज पठणानंतर जगात शांतता, सौहार्द आणि बंधुभाव टिकून राहावा, यासाठी विशेष प्रार्थना करण्यात आली. त्यानंतर सर्वांनी एकमेकांची गळाभेट घेऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या.

पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, आमदार साजिद खान पठाण आणि मान्यवरांनी ईदगाहवर येऊन नमाज अदा करणाऱ्या नागरिकांना गुलाबपुष्प देऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या. प्रशासनाच्या वतीने ईदगाह परिसरात सुरक्षेचे चोख बंदोबस्त ठेवण्यात आले होते आणि सर्वत्र पोलीस बंदोबस्त तैनात होता.ईदनिमित्त सर्वत्र जलोषाचे आणि भाईचाऱ्याचे वातावरण होते. लोकांनी एकमेकांच्या घरी जाऊन शुभेच्छा दिल्या आणि शिरखुरम्यासारख्या पारंपारिक मेजवानीचा आनंद लुटला. रमजान ईदपूर्वी शहरातील बाजारपेठांमध्येही मोठी रेलचेल आणि खरेदीसाठी गर्दी पाहायला मिळाली होती. ?आरआरसी नेटवर्कच्या वतीने सर्व मुस्लिम बांधवांना रमजान ईदच्या मनापासून शुभेच्छा.





श्री धनेश्वरी मानव विकास मंडळ व्दारा संचालित

**डॉ. वंदनाताई जगन्नाथराव ढोणे ग्रामीण आयुर्वेद महाविद्यालय, पातूर, ता. पातूर, जि. अकोला**

**Walked-In-Interview**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व्दारा मंजूर झालेल्या जाहीरातीनुसार खालील विषयांमध्ये / विभागामधील राजीनामा किंवा पदोन्नती झाल्यामुळे रिक्त असलेल्या पदांवर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्तीकरीता अर्हता प्राप्त उमेदवारांनी आपले आवेदनपत्र आवश्यक सर्व कागदपत्रांसह सादर करून विद्यापीठ निवड समितीसमोर प्रत्यक्ष मुलाखतीकरीता दिनांक 04.04.2026 रोजी सकाळी 11.00 वाजता महाविद्यालयाच्या कार्यालयामध्ये उपस्थित राहावे.

| अ.क्र. | विषय/ विभाग | पदनाम | पदसंख्या | आरक्षण/वर्गवारी |
|---|---|---|---|---|
| 01 | प्रशासन | प्राचार्य | 1 | खुले |
| 02 | संहिता सिद्धांत | व्याख्याता | 1 | खुले |
| 03 | संस्कृत | व्याख्याता | 1 | खुले |
| 04 | अगदतंत्र व्यवहार आयुर्वेद | व्याख्याता | 1 | खुले |
| 05 | शल्यतंत्र | व्याख्याता | 1 | अ.जा. |
| 05 | शालाक्यतंत्र | व्याख्याता | 1 | अ.जा. |
| | | | 1 | खूले |
| 06 | कायचिकित्सा | प्रपाठक | 1 | खुले |
| | | व्याख्याता | 1 | खुले |
| 07 | पंचकर्म | व्याख्याता | 1 | खूले |

सचिव
श्री धनेश्वरी मानव विकास मंडळ द्वारा संचालित
डॉ. वंदनाताई जगन्नाथराव ढोणे
ग्रामीण आयुर्वेद महाविद्यालय पातूर ता. पातूर, जि. अकोला

प्राचार्य
डॉ. वंदनाताई जगन्नाथराव ढोणे
ग्रामीण आयुर्वेद महाविद्यालय,
पातूर, ता. पातूर, जि. अकोला

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK